। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २३३ वा । मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## वडील नव्हे तर आईच्या जातीच्या आधारे मुलीला मिळणार एससी प्रमाणपत्र

### सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था: शिक्षणाशी निगडीत गरज लक्षात घेता सुप्रीम कोर्टाने सोमवारी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. अल्पवयीन मुलीला तिच्या आईच्या जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जारी करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. कोर्टाच्या या निर्णयाचे परिणाम पुढील काळात दिसून येणार आहेत. सुप्रीम कोर्टात आधीपासून अनेक याचिका प्रलंबित आहेत, ज्यात प्रथा परंपरेच्या नियमांना आव्हान देण्यात आले आहे. ज्यानुसार मुलाला वडिलांच्या जातीच्या आधारे जात प्रमाणपत्र दिले जाते.**

माहितीनुसार, सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने मद्रास हायकोर्टाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका फेटाळली. ज्यात पुडुचेरीतील एका मुलीला एससी जात प्रमाणपत्र देण्याचे आदेश दिले होते. जर मुलीला वेळेवर जात प्रमाणपत्र मिळाले नसते तर तिच्या भविष्यावर त्याचे परिणाम झाले असते असे सुप्रीम कोर्टाने म्हटले. वेळेनुसार परिस्थिती बदलत आहे. मग आईच्या जातीच्या आधारे जात प्रमाणपत्र का जारी केले जाऊ शकत नाही असे सरन्यायाधीशांनी म्हटले. सुप्रीम कोर्टाची ही टिप्पणी सामाजिक आणि कायदेशीरदृष्ट्या मोठ्या बदलाचे संकेत मानले जात आहेत.

**काय आहे संपूर्ण खटला?**

हे प्रकरण पुडुचेरीतील एका महिलेशी संबंधित आहे. ज्यात तिने तहसिलदार कार्यालयात अर्ज दाखल करत तिच्या २ मुली आणि एका मुलाला आईच्या जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जारी करण्याची मागणी केली होती. या महिलेने अर्जात म्हटले होते की, माझे आई वडील, आजी आजोबा सगळे हिंदू द्रविड समुदायाशी संबंधित आहेत. लग्नानंतर माझे पतीही माझ्या माहेरी राहतात असे तिने म्हटले होते. या प्रकरणी केंद्र सरकारच्या जुन्या अधिसूचनेचा उल्लेख करण्यात आला. ५ मार्च १९६४ आणि १७ फेब्रुवारी २००२ मध्ये जारी राष्ट्रपती अधिसूचना आणि गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार, कुठल्याही व्यक्तीची जात मुख्यत: वडिलांची जात आणि त्यांच्या निवासस्थानावर आधारे केली जात आहे.

**वडिलांच्या आधारेच ठरते मुलांची जात**

सुप्रीम कोर्टाने यापूर्वी अनेक प्रकरणांमध्ये हे तत्व कायम ठेवले आहे की मुलाची जात सामान्यतः वडिलांच्या जातीवरून ठरवली जाते. २००३ च्या पुनीत राय विरुद्ध दिनेश चौधरी या खटल्यात कोर्टाने आरक्षणाच्या बाबतीत वडिलांची जात ही जात ठरवण्यात निर्णायक घटक असेल आणि पारंपारिक हिंदू कायद्यानुसार मुलांना त्यांची जात त्यांच्या आईकडून नाही तर वडिलांकडून मिळते हे म्हटले होते. परंतु २०१२ मध्ये रमेशभाई दबाई नाइका विरुद्ध गुजरात सरकार या खटल्यात सुप्रीम कोर्टाने हे तत्व काहीसे शिथिल केले. त्या निर्णयात न्यायालयाने आंतरजातीय विवाहातून जन्मलेल्या मुलाची जात किंवा आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्यातील विवाह, केवळ वडिलांच्या जातीच्या आधारे यांत्रिकरित्या निश्चित केली जाऊ शकत नाही असं म्हटले. अशा प्रकरणांमध्ये असा निष्कर्ष काढता येतो की मूल वडिलांच्या जातीशी संबंधित असेल, परंतु हा निष्कर्ष अंतिम आणि परिपूर्ण नाही असं कोर्टाने स्पष्ट केले होते.

दरम्यान, आताच्या निर्णयात सुप्रीम कोर्टाने मुलीच्या हिताला प्राधान्य देत तिला आईच्या जातीच्या आधारे एससी जात प्रमाणपत्र जारी करण्याची परवानगी दिली आहे. परंतु त्यासोबतच जात निर्धारणाशी संबंधित प्रमुख कायदेशीर प्रश्नांवर अंतिम निर्णय नंतर घेतला जाईल असेही स्पष्ट केले आहे. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाने देशभरात जात प्रमाणपत्र, आरक्षण आणि आंतरजातीय विवाह यासंबंधातील अधिकारांवरून नव्याने चर्चा होणार आहे. जर भविष्यात कोर्टाने आईच्या जातीलाही निर्णायक आधार मानला तर देशातील सामाजिक न्याय व्यवस्थेत मोठे बदल घडू शकतात असे कायदेतज्ज्ञ सांगतात.

## लातूर येथे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास प्रारंभ

### शासनाच्या जास्तीत जास्त योजनांचा लाभ सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना देण्यासाठी प्रयत्न करणार-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**सलग दुसऱ्या वर्षी निधी संकलनात लातूर जिल्हा राज्यात द्वितीय**




**लातूर /प्रतिनिधी:** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास जिल्ह्यात आजपासून प्रारंभ झाला आहे. देशाच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या, बलिदान करणाऱ्या सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी यामाध्यमातून आपल्याला प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने सशस्त्र सेना ध्वजदिन निधीमध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक बोर्डाच्या अध्यक्ष श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, जिल्हा सैनिक अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.), ईसीएचएसचे प्रभारी अधिकारी कर्नल प्रकाश राजकर (नि.), ले. कर्नल बी. आर. हरणे (नि.) यांच्यासह वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. प्रारंभी वीरमाता, वीरपिता यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. तसेच शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांमुळे आपण सुरक्षित आहोत. या सैनिक, माजी सैनिकांच्या, त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना हातभार लावण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात आपले योगदान द्यावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अभिसरणासह इतर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. माजी सैनिक कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठीही विशेष उपक्रम हाती घेण्यात येतील, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

प्रत्येक वर्षी ७ डिसेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन करण्यात येते. ७ डिसेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत लातूर जिल्ह्याला ४७ लक्ष रुपये निधी संकलनाचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. मात्र, जिल्ह्यात १ कोटी १५ लाख ९५ हजार रुपये निधी संकलन करून २४६.७० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. त्यामुळे निधी संकलनात जिल्ह्याने सलग दुसऱ्या वर्षी राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. यंदाही जिल्ह्याला ४७ लाख रुपयांचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले.

यावेळी उपस्थित वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शौर्य पदक प्राप्त सैनिकांच्या वीरपत्नी, माजी सैनिक, विशेष पुरस्कार प्राप्त माजी सैनिक पाल्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. गतवर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय कार्यालय प्रमुखांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. 'गंध स्वरांचा' टीमने यावेळी देशभक्तीप्र गीतांचे सादरीकरण केले. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपिक एस. व्ही. घोंगडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मांजरा साखर कारखान्याकडून ऊस बिलापोटी पहिल्या हप्त्याची रक्कम अदा



**लातूर /प्रतिनिधी:** राज्यांतील सहकार क्षेत्रांतील नावलौकिक असलेल्या मांजरा परिवारातील मेरुमणी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५- २६ चा चालु गळीत हंगाम मांजरा परिवाराचे मार्गदर्शक राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या जोमाने सुरू असून दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ अखेर कारखान्याकडे गाळपास आलेल्या उसासाठी प्रति मॅट्रिक टन २७५०/- रुपये प्रमाणे उसाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम दिनांक ८ डिसेंबर रोजी कारखान्याकडे गाळपास दिलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी दिली आहे. संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या बँक शाखेमधून ऊस बिलाची रक्कम उचल करावी असे आवाहन कारखाना व्यवस्थापन व संचालक मंडळाने केले आहे.

कारखान्याने चालू गाळप हंगामामध्ये गाळपास येणाऱ्या उसासाठी प्रति मेट्रिक टन ३१५० रुपयांचा किमान ऊस दर जाहीर केला आहे.मांजरा साखर कारखान्याकडून चालू गाळप हंगामामध्ये दिनांक ७ डिसेंबर अखेर १ लाख ३३ हजार २९० मॅट्रिक टन उसाचे गाळप केले असून ८२ हजार २५० मॅट्रिक टन साखरेचे उत्पादन केले आहे तर १२ लाख २१ हजार ६१८ लिटर इथेनॉलचे उत्पादन केले असून ४९ लाख ५२ हजार ८५० के डब्ल्यू एच विजेची निर्यात महावितरण कंपनीला केली असून चालु हंगामात गाळपासाठी १०० टक्के ऊसाची तोडणी हार्वेस्टर द्वारे सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.

## ओंकार साखर कारखाण्याकडून शेतकऱ्यांना २९००/- रुपये प्रमाणे पहिला हप्ता जाहीर

### चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांची माहिती



**निलंगा/आयुब बागवान:** तालुक्यातील अंबुलगा येथील डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी सा. कारखाना लि. लिज ओंकार साखर कारखाना यूनिट नं. २ कारखान्याच्या वतीने गळीत हंगाम सन २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास एफआरपीपोटी पहिला हप्ता प्रति मे. टन २ हजार ९०० रुपये प्रमाणे ऊस बिल हप्ता देण्याचे ठरले असल्याची माहिती कारखान्याच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे. कारखान्याचे चेअरमन श्री बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंबुलगा (बु.) येथील ओंकार साखर कारखाना यूनिट नं. २ या कारखान्याचा सन २०२५-२६ गळीत हंगाम यशस्वीपणे सुरू आहे. ०८ डिसेंबर अखेर कारखान्याचे गाळप ८० हजार मे टन. इतके झाले आहे. ३० नोव्हेंबर २०२५ अखेर गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपीपोटी प्रति मे. टन २ हजार ९०० रुपये प्रमाणे ऊस पुरवठादार शेतकरी यांना अदा करण्यात येणार आहे. हा दर अंतिम नाही याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच मागील वर्षानुसार या ही वर्षी गळीतास आलेल्या ऊसास कारखाना धोरणानुसार दीपावली सणानिमित्त मोफत साखर वाटप करण्याचे कारखाना व्यवस्थापनाने ठरवले आहे. चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून कारखाना व्यवस्थापन प्रयत्नशील आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**पक्षाच्या घटना सादर करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश...**

### चिमटा दयाचा



**लातुरातील पाईपलाईन जुन्या झाल्याने लिकेजचे प्रमाण वाढले आहे ! त्यामुळे नळास दुषीत पाणी येत असल्याने रोगराई होण्याची शक्यता आहे!!**

## लातूर जिल्ह्यातील व इतर पोलीस स्टेशन हद्दीतील २३ गंभीर घरफोड्या उघड

- चोरी गेलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम व दोन मोटारसायकलीसह कुख्यात टोळीतील ४ आरोपी जेरबंद
- तीन वर्षांपासून सक्रिय असलेले घरफोड्या करणारे टोळीचे पर्दाफाश
- ७ आरोपींपैकी ४ अटक; एकूण मुद्देमाल ४,३७,०००/- जप्त




**लातूर /प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून घरफोड्या व चोरीच्या गुन्ह्यांची मालिका सुरू होती. या गंभीर गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानीय गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि वैज्ञानिक तपास पद्धती वापरून घरफोड्या करणाऱ्या आंतरजिल्हा कुख्यात व सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशावरून, अपर पोलीस अधीक्षक, मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेने ही महत्वाची कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली.

दिनांक ०६/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, लातूर-बार्शी रोडवरील लातूर विमानतळ टी-पॉइंट येथे चार संशयित इसम दोन मोटारसायकलीसह थांबलेले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले व सापळा लावून खालील संशयितांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतलेले संशयीत इसम, अजय वय २२, रा. सुंभा, जि. धाराशिव, अर्जुन वय २७, रा. भिवंडी/झरेगाव, जि. सोलापूर, केशव, वय ३०, रा. खंडाळा, ता. तुळजापूर, विक्की, वय १९, रा. सुंभा, जि. धाराशिव अशी असून संशयीत इसमांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे सोन्याच्या ३ अंगठ्या,१ गंठण, कानातील फुले, व रोख रक्कम ३२,००० मिळून आले.

तसेच त्यांनी गुन्ह्यात वापर केलेल्या चोरीच्या १ लाख ३० हजार रुपये किमतीच्या दोन मोटरसायकली हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक MH 25 BG 1368, टीव्हीएस अपाची 25 BF 1382 हे पण जप्त करण्यात आले आहेत.

**लातूर जिल्ह्यातील १८ व बाहेरील जिल्ह्यातील ५ असे एकूण २३ गुन्हे उघडकीस आले.**

औसा, किल्लारी, मुरुड, रेणापूर, कासारशिरसी, लातूर ग्रामीण, गातेगाव, भादा आदी ठिकाणच्या १८ घरफोड्या. तसेच उमरगा, धाराशिव ग्रामीण, मंटाळा, मुडबी (बिदर) इत्यादी ठिकाणचे गंभीर चोरीचे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची टोळी ही कुख्यात व सराईत असून एकट्या धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याला नमूद टोळी विरुद्ध चोरी, घरफोडी, दरोड्या सारखे तब्बल ५७ गुन्हे दाखल असल्याचे चौकशीत समोर आले आहे. नमूद इसमांकडून २,७५,०००/- सोन्याचे दागिने ३२,०००/- रोख रक्कम,१,३०,०००/- च्या २ मोटारसायकली, असा एकूण ४,३७,०००/- मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोउपनि राजाभाऊ घाडगे, पोउपनि प्रमोद देशमुख,पोउपनि अमर केंद्रे, पोलीस ठाणे भादा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव, मुरुडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, सपोउपनि सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार माधव बिलापटटे, युवराज गिरी, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, राजेश कंचे, मोहन सुरवसे,संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, अर्जुन राजपूत, दिनानाथ दवकते, रियाज सौदागर, प्रशांत स्वामी, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, मनोज खोसे, राहुल कांबळे, हल्लाळे, प्रविण कोळसुरे, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर, व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, जांभळे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, प्रज्वल कलमे, गोरोबा इंगोले, शैलेश सुडे, सागर आलापुरे, बाबा खोपे, महिला पोलिस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

**संशयीत इसमांची कबुली - २३ घरफोड्यांचा खुलासा**

चौकशीदरम्यान आरोपींनी कबुली दिली की, त्यांनी त्यांच्या आणखीन इतर तीन साथीदारासह मिळून गेल्या एक वर्षात लातूर, धाराशिव, बिदर जिल्ह्यातील एकूण २३ घरफोड्या केल्या असून त्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करणे इत्यादी गंभीर गुन्ह्यात ही टोळी सामील आहे.

**पोलीसांचे आवाहन**

लातूर जिल्हा पोलीस नागरिकांच्या सुरक्षेकरिता पूर्ण कटिबद्ध आहेत. नागरिकांनी घरफोडी किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनशी अथवा ११२ वर संपर्क साधावा.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारत-रशियात अनेक करार

भारत आणि रशिया दरम्यान पुतिन यांच्या दौऱ्यामुळे दृढता निर्माण झाली आहे. अमेरिकेचा भारतावर जो इनडायरेक्ट दबाब होता तो काही प्रमाणात निवाळला जाणार आहे. तसे पाहिले तर भारत आणि रशिया या दोघात मैत्री जुनी आहे. तशी अमेरिकेची नाही. अमेरिका भारतावर जळतो करण भारत हा महासत्ता बनण्याची क्षमतेचा देश आहे. भारत अनेक बाबतीत स्वयंपुर्ण आहे. यापुर्वीचे जे पंतप्रधान झाले ते इतरांचे एकत होते. तसे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी या सर्वापेक्षा वेगळे आहेत, त्यामुळे अमेरिका भारताला दबुन आहे. तरीही टॅरिफच्या माध्यमातून त्रास देणे सुरू आहे. तरी टॅरिफला भारत झुगारून वाटचाल करीत आहे. त्याच प्रमाणे अमेरिका याची मागणी इंधन तेल हे आमच्याकडून खरेदी करावे असा अट्टाहास आहे. एक प्रकारे दबाब निर्माझ करीत आहे. असो भारत दौऱ्यावर पुतीन असताना त्यांनी महत्त्वपुर्ण माहिती दिली की, अमेरिकाच आमच्याकडून म्हणजे रशियाकडून तेल खरेदी करीत आहे. अमेरिकेकडून तेल खरेदी करावयाचे म्हणजे अधिक किंमत मोजावी लागतील. महागात पडते. अमेरिका रशियाकडून तेल खरेदी करून तेच भारताला विकणे म्हणजे अमेरिका दलाली खाणार हे उघड आहे. त्यामुळे भारत थेट रशियाकडून तेल खरेदी करीत आहे. जरी अमेरिका निर्बंध लादत असला तरी त्याकडे लक्ष न देता थेट रशियाकडूनच तेल खरेदी केल्यामुळे अमेरिकेस म्हणजे ट्रम्प यांना राग येणे स्वाभाविक आहे. तरीही भारत आणि रशिया यांच्या दृढ मैत्री आहे. भारत आणि रशिया यांच्यातील संबंधामुळे तेलाचे काय विविध वस्तूचे आयात केल्या जातात. पुतिन यांच्या भारत दौऱ्यादरम्यान अनेक करार झाले आहेत. मैत्रीत दृढता निर्माण झाली आहे. त्यामुळे अमेरिकेत जळफळाट होणे स्वाभाविक आहे. भारत अमेरिकेकडून अनेक वस्तू आयात केल्या करतो आहे. त्याच प्रमाणे भारतीय वस्तूही निर्यात बऱ्या प्रमाणात केल्या जातात. अमेरिकेत भारतीय वंशाचे अनेक आहेत. सरकार मध्ये काही महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. आयटी क्षेत्रात भारतीयांची संख्या बऱ्या प्रमाणात आहे. तसे पाहिले तर भारतीयांच्या कारगीरीमुळे अमेरिकेचे नाव लौकिक होते हे अमेरिका मान्यच करते. मुळात भारतीय हे हुशार आहेत. अनेक क्षेत्रात नावजलेले आहेत. अमेरिकेच्या विकासात भारतीयांचा हात आहे हे मान्यच करावे लागते. एक भारतीयांची वसाहत अमेरिकेत ससलेली आहे. मुळात भारतीयांची अमेरिकेत संख्या चांगली आहे. ही बाब रोनाल्ड ट्रम्प यांना माहिती असावी. त्यामुळे ट्रम्प यांचा जळफलाट वाढणे स्वाभाविक आहे. रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्या भारत दौऱ्या दरम्यान जे अनेक करार झाले हे अमेरिकेले ओळखले असणार? अमेरिका हा धुर्त विचाराचा आहे. भारतावर दबाब राहावा अशा विचाराने वागत आहे. कधी भारत व पाकिस्तानच्या तणावाच्यावेळी मध्यस्थपना केल्याचा वक्तव्य करीत आहे. कधी तर माझ्या म्हणजे ट्रम्प यांच्यामुळे युद्ध थांबले आहे. असे बालिश वक्तव्य करीत असतात. भारत अशा बाबीकडे फारसे लक्ष देत नाही. तरी जो काही प्रमाणात भारतीयांना अमेरिकेकडून त्रास देणे सुरूच आहे. भारत व रशिया दरम्यान अनेक करार झाल्याचे सांगण्यात येतात. भारताने भारताच्या फायद्याचे करार करणार यात शंका नाही. पुतिन यांचा दोन दिवसाचा दौरा झाल्याने अमेरिकेच्या पोटात दुखणार आहे. अमेरिका असा देश आहे की, जगातील सर्वच देश आपल्या दबावाखाली राहावेत. आपलेच वर्चस्व राहावे असा विचाराने वाटचाल सुरु आहे. ट्रम्प यांची दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्यावर ते वेगळया गुर्मीत वावरताना दिसून येत आहेत. आलिकडील त्यांचे वक्तव्य पाहाता भारत हा अविचारी आहे का असे वाटायाला लागले होते. मीच भारत-पाक युद्ध थांबविले. भारत आमचे पुर्ण एकत आहे असेच त्यांचे विचार जाहीर होत होते. भारतात लोकशाही त्यानुसार वाटचाल केली जाते. संसदेत जे घडते त्यानुसार वाटचाल होते. असे असताना ट्रम्प यांचे फाजील वक्तव्यावर हंसा पिकली जात आहे. टॅरिफ वरून तर दंडमशाही दिसून आली. त्यात भारत, रशिया व चीन मधील मधल्या काळात चर्चा होत असताना तर ट्रम्प रागावले होते. तसे पाहिले तर रशिया आणि भारत यांच्यात बैठकीत अनेक महत्त्वाचे करार आणि समझोते होतात. पुतिन यांच्या भेटीत साधारणपणे अनेक क्षेत्रांमध्ये करारांवर भर दिला जातो: संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य ब्रह्मोस क्षेपणास्त्र, लष्करी तंत्रज्ञान, संयुक्त उत्पादन यावर सहकार्याची पुष्टी. भारतीय सैन्यासाठी आवश्यक उपकरणे, स्पेअर पार्ट्स आणि देखभाल करार. ऊर्जा क्षेत्रातील करार अणुऊर्जा प्रकल्पांसाठी इंधन व तंत्रज्ञान सहकार्य. रशियाकडून क्रूड ऑइल आयात वाढविणे. नवीन ऊर्जा भागीदारी (गॅस पाइपलाईन, एलएनजी आयात). व्यापार व आर्थिक करार द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य. औषधे, कृषी, स्टील, खते आणि कोळसा क्षेत्रात करार. भारतीय कंपन्यांना रशियात गुंतवणुकीची संधी. अवकाश आणि विज्ञान गगनयान मोहिमेसाठी रशियन तांत्रिक सहकार्य. उपग्रह व रॉकेट तंत्रज्ञानात संयुक्त संशोधन. प्रादेशिक आणि सामरिक सहमती दहशतवादाविरोधी सहकार्य. बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेला पाठिंबा. सांस्कृतिक आणि शैक्षणिक संबंध विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सहकार्य. पर्यटन, संस्कृती आणि भाषा शिक्षणाबाबत समझोते. थोडक्यात असे की, भारत-रशिया शिखर परिषदेत राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत दोन्ही देशांमध्ये संरक्षण, ऊर्जा, व्यापार, अवकाश, विज्ञान आणि दहशतवादविरोधी सहकार्यासंदर्भात महत्त्वाचे करार झाले. द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासोबतच बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेला पाठिंबा देण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली. दोन्ही देशांनी आर्थिक व सुरक्षा सहकार्यास पुढील काही वर्षांत नवे बळ देण्याचा निर्णय घेतला. या कृतीमुळे अमेरिकीच्या पोटात दुखणार आहे हे नक्की!

# नवीन फौजदारी कायद्यांचे प्रदर्शनातील प्रात्याक्षिकाद्वारे ज्ञान..!

देशात १ जुलै २०२४ पासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय पुरावा कायदा हे तीन नवीन कायदे लागू झाले आहेत. या नवीन फौजदारी कायद्यांच्या पार्श्वभूमीवर, नागरिकांना गुन्हा घडल्यापासून अंतिम शिक्षा होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया समजावी, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात प्रात्यक्षिक विशेष आकर्षण ठरले. या प्रात्यक्षिक प्रदर्शनाने गुन्हा नोंदणीपासून शिक्षा आणि पुनर्वसनापर्यंतचा संपूर्ण न्यायप्रक्रियेचा प्रवास अत्यंत स्पष्ट, जिवंत आणि लोकशिक्षणात्मक स्वरूपात मांडला आहे. नवीन फौजदारी कायद्यांमुळे वैज्ञानिक तपास, तत्काळ प्रतिसाद, डिजिटल पुरावे, कठोर शिक्षा आणि पीडित केंद्रित न्याय या तत्त्वांना प्राधान्य मिळाले आहे. हे प्रदर्शन जनजागृतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे. प्रदर्शनात २५ ते ३० हजार नागरिकांनी भेट देऊन या कायद्यांसंदर्भातील ज्ञान अवगत केले.

भारताच्या न्यायप्रशासनात ऐतिहासिक बदल घडवणाऱ्या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रात्यक्षिक प्रदर्शनाने नागरिक, विधिविद्यार्थी, पोलीस अधिकारी तसेच न्यायव्यवस्थेतील विविध घटकांना नव्या कायद्यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. न्यायसंस्थेच्या सर्व स्तरांवर पारदर्शकता, गतीमानता आणि नागरिकाभिमुखता वाढवण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या या नव्या कायद्यांचे तत्त्वज्ञान, अंगभूत प्रक्रिया आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर या प्रदर्शनामधून प्रभावीपणे उलगडण्यात आला.

**नियंत्रण कक्षातूनच पिडीतेला न्यायाची हमी**

नव्या कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया आणखी सोपी, डिजिटल आणि सर्वासाठी उपलब्ध झाली आहे. प्रदर्शनात तयार केलेल्या नियंत्रण कक्षाच्या प्रतिकृतीमध्ये, नागरिकांकडून तक्रार स्वीकारणे, ऑनलाईन एफआयआर दाखल करणे, तक्रारदारास त्वरित स्वीकृती देत प्रतिसाद देण्याविषयी प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. पीडित मुलगी जेव्हा नियंत्रण कक्षाला कॉल करते, त्यावेळी नियंत्रण कक्षाचे कार्य जनतेसमोर येते. पिडीतेला घाबरू नको, आम्ही तुझ्या पाठीशी आहे. हे शब्दच दिलासा देतात आणि न्यायाची हमी मिळवून देतात. नवीन कायद्यांमध्ये पीडितांचे हक्क अधिक मजबूत करण्यावर भर असल्याने तक्रारदाराला तपासाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती देण्याची सक्ती करण्यात आली आहे. प्रदर्शनातील या विभागात नागरिकांना पीडित हक्क, महिलांसाठी विशेष संरक्षण आणि पोलीस तपासाची गतीने हाललेली सूत्रे दाखविण्यात आली.

**तत्काळ, पारदर्शक आणि जबाबदार तपास**

प्रदर्शनातील पोलीस स्टेशन विभागात पोलिसांची भूमिकाच नव्या दृष्टीकोनातून मांडण्यात आली. नव्या फौजदारी संहितेनुसार पोलीस तपासाची वेळमर्यादा निश्चित करण्यात आली असून, तपासात अनावश्यक विलंब किंवा अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. या विभागात सीसीटीव्हीयुक्त चौकशी कक्ष, महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र सुविधा आणित्वरितपंचनामा करण्याची आधुनिक पद्धत प्रत्यक्ष दाखवण्यात आली. यामुळे तपासाची पारदर्शकता आणि विश्वसनीयता वाढवण्याचा उद्देश स्पष्टपणे नागरिकांसमोर आला.

**न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पुराव्यांची अचूकता**

नवीन फौजदारी कायद्यांचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे वैज्ञानिक पुराव्यांना प्राधान्य देणे आहे. साक्षी पुराव्यांवरील अवलंबित्व कमी करून न्यायवैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याचा प्रयत्न नव्या कायद्यांतून दिसून येतो. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या प्रयोगशाळा विभागात बोटांचे ठसे ओळखण्याची आधुनिक तंत्रज्ञान, रक्त, विष, केस, ऊतकांचे नमुने तपासण्याची प्रक्रिया, डीएनए प्रोफाइलिंग, डिजिटल फॉरेन्सिक मोबाईल, लॅपटॉप, सीसीटीव्ही फुटेज विषणामध्ये नवीन फौजदार कायद्यांमुळे आलेली गतिशिलता दाखविण्यात आली. सात वर्षकिंवात्यापेक्षाजास्तशिक्षाझालीअसल्यासअशागुन्ह्यांमध्येनवीनकायद्यांनुसार न्याय सहायक प्रयोगशाळेद्वारे पुरावे गोळा करण्याची सक्ती आहे. त्यानुसार मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स उपलब्ध करून देण्यात येत आहे. न्यायालयीन प्रक्रियेत विलंब टाळण्यासाठी तपास अधिकाऱ्यांना वैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याबाबत नव्या कायद्यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. प्रदर्शनातही हेच अधोरेखित करण्यात आले आहे.

**वैद्यकीय सहाय्य व विष शास्त्र विभागात पीडितांच्या न्यायाची प्रक्रिया वेगात**

गुन्हा घडल्यानंतर पीडितांना वेगाने न्याय मिळवून देण्यासाठी ही न्यायप्रक्रियेची अत्यंत आवश्यक पायरी आहे. नव्या कायद्यांनुसार अत्याचारग्रस्त, जखमी व्यक्ती, लैंगिक अत्याचार पिडीत यांच्या वैद्यकीय तपासणीबाबत अधिक स्पष्ट, संवेदनशील आणि कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रदर्शनातील या विभागात वैद्यकीय तपासणीची नव्या मानकांनुसार प्रक्रिया, अहवालांची कालमर्यादा, डॉक्टरांची जबाबदारी आणि नमुन्यांची शृंखला यांचे उत्कृष्ट स्पष्टीकरण दिले आहे. ऑनलाईन पद्धतीने नमुन्यांचे अहवाल संबंधित पोलीस स्टेशनला पाठविण्यात येत असल्यामुळे न्यायप्रक्रियेत गतीमानता आली असल्याचा सकारात्मक बदल प्रदर्शनातून दिसून येत आहे.

**अभियोग संचालनालयात तपास ते न्यायालयीन लढाईपर्यंतचा समन्वय**

नवीन कायद्यात अभियोजन विभागाची भूमिका अधिक बलवान करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या तपासानंतर पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाचे परीक्षण करण्यासोबतच, न्यायालयीन प्रक्रियेत दोषारोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुराव्यांची शाश्वती तपासणे ही अभियोजनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे दिसून येते. याविभागात आरोपींवर कोणत्या कलमांनुसार गुन्हा दाखल करता येईल. याबाबत मार्गदर्शन, पुराव्यांची मांडणी, साक्षीदार व्यवस्थापन, पीडितांचे प्रतिनिधित्व, न्यायालयीन दस्तऐवजांची तयारी या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण नव्या कायद्यांतील तरतुदींद्वारे नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

**गतीमान न्याय आणि पारदर्शक कार्यपद्धती**

नव्या फौजदारी कायद्यानुसार न्यायालयीन प्रक्रियेतील अनावश्यक विलंब कमी करण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. दिवाणी न्यायालयात गुन्हेविषयी साक्षीदाराची ऑनलाइन साक्ष देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, वेळमर्यादा असलेली सुनावणी, पीडितांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन, डिजिटल चार्जशीट, डिजिटल पुरावे या सर्व बाबींची नवीन फौजदारी कायद्यांच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. ''गुन्हा घडला ते अंतिम शिक्षा'' या संपूर्ण प्रक्रियेची साखळी नागरिकांना साध्या आणि समजण्यास सोप्या पद्धतीने प्रात्याक्षिकाद्वारे मांडण्यात आली. तारीख पे तारीख टाळण्यासाठी नवीन कायद्यांतील तरतुदींचा उहापोह करण्यात आला.

**नव्या कायद्यांद्वारे आरोपींसाठी योग्य दंड व्यवस्थापन**

प्रदर्शनातील महत्त्वाचा भाग म्हणजे नवीन फौजदारी कायद्यातील कलमानुसार शिक्षेची माहिती होय. दिवाणी न्यायालयाने ठोठाविलेल्या शिक्षेला मा. उच्च न्यायालयात होत असलेली सुनावणी प्रात्याक्षिकाद्वारे दाखवित हुबेहुब न्यायालयातील प्रसंग उभा करण्यात आला. पारंपरिक शिक्षेच्या पद्धतीत काही बदल करून, समाजहित, पुनर्वसन आणि दंडाची प्रभावीता वाढवण्याकडे कायदा अधिक झुकत असल्याचे या विभागातून स्पष्ट केले गेले. कायदे अधिक स्पष्ट, काटेकोर आणि गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार वर्गीकृत असल्याने तपास, अभियोजन आणि न्यायालयीन निर्णय सुलभ झाले आहेत.

**प्रदर्शनात प्रश्नावलीच्या माध्यमातूनही कायद्याचे ज्ञान**

नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित हे प्रात्यक्षिक प्रदर्शन केवळ कायद्यांची माहिती देणारे नव्हते, तर भारतातील न्यायव्यवस्थेतील परिवर्तनाची सशक्त झलक होते. गुन्हा नोंदवण्यापासून अंतिम निकालापर्यंतची प्रक्रिया अधिक तांत्रिक, पारदर्शक, जलद आणि नागरिकमैत्री बनवण्याचा उद्देश स्पष्टपणे सर्वासमोर आला. नव्या कायद्यांची मांडणी, तंत्रज्ञानाचा उपयोग, वैज्ञानिक तपासाला दिलेले प्राधान्य, पीडितांचे हक्क आणि न्यायप्रक्रियेतील गतीमानता या सर्व माध्यमांतून भारताची न्यायव्यवस्था अधिक सक्षम, संवेदनशील आणि आधुनिक होत असल्याचा संदेश या प्रदर्शनाने परिणामकारकपणे दिला. प्रदर्शनामध्ये विविध कलमांच्या माहितीचे पोस्टर्स आकर्षक रंगसंगतीने दाखविण्यात आले आहे. प्रदर्शनात केवळ सादरीकरणच नाही, तर कायद्याविषयी अधिक सखोल माहिती होण्यासाठी १० प्रश्नांची दोन मिनिटे कालावधी असलेली डिजिटल स्वरूपातील प्रश्नावलीच्या स्क्रीन्स ठेवण्यात आहेत. या स्क्रीनवर नागरिक प्रश्नांची उत्तरे देऊन या कायद्यासंबंधित अधिक माहिती जाणून घेत आहेत. तसेच प्रदर्शनाबाबत डिजिटल स्वरूपात प्रतिसाद देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कारागृहांमध्ये कैद्याकडून निर्मित वस्तूंचे स्टॉल्सही या ठिकाणी होते.

या प्रदर्शनात नागरिकांना गुन्हा घडणे, त्याची नोंद, तपास, वैज्ञानिक पुरावे, वैद्यकीय सहाय्य, अभियोजन, न्यायालयीन सुनावणी आणि अंतिम निकालापर्यंत न्यायव्यवस्थेची संपूर्ण साखळी नव्या पद्धतीने समजावून सांगण्यात आली. त्यामुळे जुन्या कायद्यातील कलमे आणि नवीन फौजदारी कायद्यांतील कलमांचे ज्ञान सहजरित्या नागरिकांना मिळाले.

# हिवाळ्यात अश्वगंधा खाल्ल्याने मिळतात आश्चर्यकारक फायदे, जाणून घ्या सेवन करण्याची पद्धत



अश्वगंधा औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. आयुर्वेदात ती अत्यंत फायदेशीर मानली जाते. अश्वगंधा ही आयुर्वेदात अनेक रोगांवर उपचार करण्यासाठी वापरली जाणारी एक औषधी वनस्पती आहे. अश्वगंधा पुरुषांसाठी फारच फायदेशीर असल्याचे म्हटले जाते.

परंतु, कोणीही ते सेवन करू शकते. अश्वगंधामध्ये अँटीऑक्सिडेंट गुणधर्म आहेत जे शरीराला फ्री रॅडिकल्सपासून वाचवतात. अश्वगंधा खाल्ल्याने शरीराची शक्ती वाढते आणि अनेक आजारांपासून बचाव होतो. जाणून घेऊया हिवाळ्यात अश्वगंधा सेवन करण्याचे फायदे.

**सांधेदुखी कमी करते**

हिवाळ्यात सांधे आणि हाडांचे दुखणे वाढते. जर तुम्हाला हिवाळ्यात सतत सांधेदुखीचा त्रास होत असेल तर तुमच्या आहारात अश्वगंधा समाविष्ट करा. अश्वगंधा सेवन केल्याने सांधेदुखी आणि सूज दूर होते. त्यामुळे संधिवाताच्या लक्षणांपासूनही आराम मिळतो. जर तुम्हाला दीर्घकालीन सांधेदुखी असेल तर अश्वगंधा सेवन फायदेशीर ठरू शकते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**

हिवाळ्यात शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. अशा परिस्थितीत, अश्वगंधा सेवन करणे फायदेशीर आहे. अश्वगंधा सेवन केल्याने कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे होणाऱ्या आरोग्य समस्या दूर होण्यास मदत होते. हिवाळ्यात नियमितपणे अश्वगंधा सेवन केल्याने तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होईल. अश्वगंधा सेवन केल्याने अनेक हंगामी आजारांपासून संरक्षण होण्यास देखील मदत होते. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी, अश्वगंधा वृद्ध आणि मुलांना दिली जाऊ शकते.

**शरीराची उष्णता वाढवते**

हिवाळ्यात थंडीपासून संरक्षण करण्यासाठी अश्वगंधा देखील सेवन करता येते. अश्वगंधा खूप उबदार प्रभाव पाडते. त्यामुळे या ऋतूत अश्वगंधा सेवन करणे फायदेशीर ठरते. हिवाळ्यात अश्वगंधा सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढते आणि सर्दीशी संबंधित आजारांपासून संरक्षण होते. अश्वगंधा शरीराला अंतर्गत उष्णता प्रदान करते आणि सर्दीपासून संरक्षण करते.

**सर्दी आणि खोकल्यापासून आराम देते**

हिवाळ्यात सर्दी आणि खोकला खूप सामान्य आहे. शिवाय, हिवाळ्यात घसा खवखवणे देखील सामान्य आहे. म्हणून, या ऋतूत अश्वगंधा सेवन केले पाहिजे. हिवाळ्यात अश्वगंधा सेवन केल्याने सर्दी आणि घसा खवखवणे यासारख्या आरोग्य समस्या कमी होण्यास मदत होते. या ऋतूत अश्वगंधा सेवन केल्याने सर्दीशी संबंधित समस्या देखील कमी होण्यास मदत होते. ते संसर्ग टाळण्यास देखील मदत करते.

**ताणतणाव कमी करते**

जर तुम्हाला सतत ताण किंवा तणाव येत असेल तर अश्वगंधा सेवन करण्याचा विचार करा. अश्वगंधा ताण कमी करते. अश्वगंधा सेवन केल्याने झोपेची गुणवत्ता सुधारते. अश्वगंधामधील गुणधर्म ताण संप्रेरक कमी करतात आणि झोपेची गुणवत्ता सुधारतात. जरी तुम्हाला झोपेचा त्रास होत असेल तरी अश्वगंधा सेवन करा. जर तुम्हाला ताण येत असेल तर तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकता.

## अशा प्रकारे मुलांमध्ये दिसतात डेंग्यूची लक्षणे, डॉक्टरांकडून जाणून घ्या प्रतिबंधात्मक पद्धती

पावसाळ्यात अनेक प्रकारचे जिवाणू आणि विषाणूजन्य संसर्ग होण्याचा धोका असतो. या आजारांसोबतच या मोसमात डासांमुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाणही वाढले आहे. या आजारांपैकी डेंग्यू हा धोकादायक आजार आहे. काही प्रकरणांमध्ये डेंग्यूमुळे मृत्यूही होतो. दरवर्षी या आजारामुळे लोकांना आपला जीव गमवावा लागतो. पावसाळ्यात अनेक भागात पाणी साचते, त्यात डेंग्यूच्या डासांची पैदास होते, काही रुग्णांमध्ये रक्तातील प्लेटलेट्सची संख्या कमी होत राहते. त्यामुळे रुग्णाची प्रकृती गंभीर होऊ शकते. डेंग्यू कोणत्याही वयाच्या व्यक्तीला होऊ शकतो. त्याची प्रकरणे लहान मुलांमध्येही दिसून येतात.

डेंग्यू हा डेंग्यूच्या विषाणूमुळे होणारा विषाणूजन्य ताप आहे. एडिस डास माणसाला चावतो, तेव्हा हा विषाणू त्या व्यक्तीमध्ये पसरतो. डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती पावसाळ्यात होते. त्यामुळेच पावसाळ्यात जुने टायर, कुलर आणि साचलेल्या पाण्यात डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती होते. त्यामुळेच पावसाळ्यात डेंग्यूचे रुग्ण वाढतात. अशा परिस्थितीत, आपण आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. मुलांबाबत विशेष काळजी घ्यावी.

मुलांमध्ये डेंग्यूची सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे ताप, जो एका आठवड्यापर्यंत टिकू शकतो. हा ताप अचानक येतो आणि त्याच्यासोबत स्नायू आणि डोकेदुखी देखील असू शकते. काही मुलांच्या हिरड्या किंवा नाकातून रक्त येणे हे देखील डेंग्यूचे गंभीर लक्षण आहे, जे चिंतेचे कारण आहे. त्वचेवरही पुरळ उठतात. डेंग्यूची ही लक्षणे लहान मुलांमध्ये सहज ओळखता येतात. ही लक्षणे दिसल्यास ताबडतोब रुग्णालयात जाऊन उपचार करावेत.

कसे करावे संरक्षण

पावसाळ्यात मुलांना बाहेर पाठवू नका.
मुलांना पूर्ण बाह्यांचे कपडे घालायला लावा.
मच्छर प्रतिबंधक वापरा.
खिडक्या आणि दरवाजे बंद ठेवा.
जवळपास पाणी साचू देऊ नका.
डासांपासून बचाव करणारी क्रीम लावा.

## रात्रीची कमी झोप तुम्हाला पाडतेय आजारी 'या' एका चुकीमुळे बळावतोय मधुमेहाचा धोका!

दिवसभर काम करून थकवा आल्यानंतर प्रत्येक व्यक्तीसाठी आराम हा गरजेचा असतो. आपल्या आरोग्यासाठी झोप ही फार गरजेची असते. आपल्या शरीरासाठी झोप ही फार महत्त्वाची असते. पण तुम्हाला माहितीये निद्रानाश किंवा झोपेचा त्रास मधुमेहाचा धोका वाढवू शकतो एका नवीन अभ्यासात असं आढळून आलंय की, की ज्या लोकांच्या झोपेच्या कालावधीत वारंवार बदल होत असतात त्यांना मधुमेह होण्याचा धोका वाढतो.

काय नमूद केलंय नव्या अभ्यासात

अभ्यासानुसार, ज्या लोकांचा झोपेचा कालावधी सरासरी ३१ ते ४५ मिनिटांपर्यंत बदलतो. या व्यक्तींमध्ये मधुमेहाचा धोका १५म वाढल्याचं दिसून आलं. त्याच वेळी, ज्या लोकांच्या झोपेचा कालावधी एका तासापेक्षा जास्त असतो, त्यांच्यामध्ये हा धोका ५९ टक्क्यांनी वाढल्याचं पाहायला मिळालं. हा अभ्यास ळख ँदंरहज्ञ मधील ८४,००० हून अधिक व्यक्तींना यामध्ये सहभागी करण्यात आलं होतं. सहभागींनी सात रात्री एक एक्सेलेरोमीटर घातला, ज्यामुळे त्यांच्या झोपण्याच्या पद्धतींचे परीक्षण केलं जाऊ शकतं.

कमी झोपणाऱ्यांना अधिक धोका

या अभ्यासात असंही म्हणण्यात आलंय की, जे लोक कमी किंवा जास्त झोपतात त्यांना मधुमेहाचा धोका वाढतो. जास्त झोपलेल्या लोकांमध्ये हा धोका ३४म वाढल्याचं पाहायला मिळालं. झोपेची कमतरता आणि मधुमेह यांच्यातील संबंध दर्शविणारा हा पहिला अभ्यास नाही. गेल्या काही वर्षात, अनेक अभ्यासांनी हे सिद्ध झालं आहे की, झोपेच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते आणि उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, नैराश्य आणि हृदयविकार यासारख्या समस्यांचा धोका वाढतो.

तज्ज्ञांचा कधी घ्यावा सल्ला

जर तुम्हालाही झोपेच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे. नियमित झोप येण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता, जसं की, झोपण्याची ठराविक वेळ ठेवणं, झोपण्यापूर्वी फोनचा वापर कमी करणं आणि झोपण्यासाठी आरामदायक वातावरण तयार करणं. जर तरीही तुम्हाला झोपेच्या समस्या जाणवत असतील तर तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे.

## चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणण्यासाठी कोणत्या भाज्या खाव्यात? 'हे' आहेत बेस्ट ऑप्शन

महिला आणि पुरुष दोघांनाही चमकदार आणि निरोगी त्वचा हवी असते. चमकदार त्वचा मिळविण्यासाठी लोक महागड्या सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतात, ज्यामुळे कधीकधी त्यांची त्वचा काही काळासाठी चमकते. परंतु त्याचे दुष्परिणाम देखील होऊ शकतात.

पण तुम्हाला माहिती आहे का की तुम्ही जे काही खाता आणि पिता त्याचा परिणाम तुमच्या त्वचेवर देखील स्पष्टपणे दिसून येतो. म्हणूनच डॉक्टर आणि त्वचा तज्ज्ञ देखील तुम्हाला नेहमीच अशा पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला देतात, जे तुम्हाला निरोगी ठेवतातच, शिवाय तुमची त्वचा देखील चमकदार ठेवतात.

इंस्टाग्रामवरील द स्किन डायट कंपनी नावाच्या निरोगी त्वचा पेजवर अशा काही हिरव्या भाज्यांचा उल्लेख करण्यात आला आहे, ज्यांच्या सेवनाने तुमची त्वचा चमकदार होऊ शकते..

**काकडी–**

काकडी खाल्ल्याने तुमची त्वचा हायड्रेट राहते. काकडीत असलेल्या अँटिऑक्सिडंट्समुळे त्वचेवरील सुरकुत्या आणि लालसरपणाच्या समस्येपासूनही आराम मिळतो. नियमित आहारात काकडी समाविष्ट केल्याने आतड्यांचे आरोग्य सुधारते, रक्तातील साखर नियंत्रित राहते आणि वजन देखील नियंत्रणात राहते.

**पालक–**

पालकातील व्हिटॅमिन ए आणि सी त्वचेला हायड्रेट ठेवते आणि बारीक रेषा आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत करते. त्यात असलेल्या प्रथिनांचे प्रमाण चेहऱ्याचा रंग सुधारते. त्याचे सेवन रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करते आणि डोळे निरोगी ठेवते.

**कोबी–**

केळ्याच्या भाजीमध्ये नियासिन आणि व्हिटॅमिन सीचे गुणधर्म असतात, जे त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. केळ्यामध्ये असलेल्या कर्करोगविरोधी संयुगांमुळे, त्याचे सेवन कर्करोगाचा धोका देखील कमी करू शकते आणि ते तुमच्या डोळ्यांसाठी देखील फायदेशीर आहे. केळ्याचे सेवन केल्याने तुमची कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित राहते.

**माचा–**

माचामध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे तुमची त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट गुणधर्म मुरुमे कमी करण्यास आणि त्वचेची लवचिकता वाढविण्यास काम करतात. माचाचे सेवन केल्याने यकृत निरोगी राहते आणि वजन नियंत्रित करण्यास किंवा कमी करण्यास देखील मदत होते.

**अ‍ॅव्होकॅडो–**

अ‍ॅव्होकॅडोमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी अ‍ॅसिड, व्हिटॅमिन ई, सी, अँटी-ऑक्सिडंट्स तुमची त्वचा नैसर्गिकरित्या निरोगी आणि चमकदार ठेवण्यास मदत करू शकतात. इतकेच नाही तर त्याचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते, हृदयरोगांचा धोका कमी होतो आणि डोळे निरोगी राहण्यास मदत होते.

# थायरॉईडची काळजी घेण्यासाठी...

(मागील अंकावरुन...)

आयोडीनयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा, पण अतिरेक टाळा. आयोडीनच्या कमतरतेमुळे किंवा अतिरेकामुळे थायरॉईडवर परिणाम होतो, त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्या.
नियमित व्यायाम: दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम केल्याने थायरॉईडचे कार्य सुधारते, चयापचय क्रिया (ाश-ींरलेश्रळीा) वाढते आणि तणाव कमी होतो.
पुरेसे पाणी: भरपूर पाणी प्या. यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते आणि थायरॉईडच्या रुग्णांसाठी ते फायदेशीर आहे.
तणाव व्यवस्थापन: योग, ध्यान किंवा इतर आवडीच्या गोष्टी करून तणाव कमी करा, कारण तणावामुळे थायरॉईड असंतुलित होऊ शकतो.



नियमित तपासणी: थायरॉईडची समस्या असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमितपणे थायरॉईड फंक्शन टेस्ट (ढहूीेळव ऱ्ींपल-ींळेप ढशीीं - ढऋढ) करून घ्या. थायरॉईडच्या लक्षणांकडे लक्ष द्या (ड्ढ्ाीीी ेष ढहूीेळव)
सतत थकवा आणि अशक्तपणा.
वजन वाढणे किंवा कमी होणे.
केस गळणे, त्वचा कोरडी होणे.
हात-पाय सुजणे.
थंड वातावरण सहन न होणे (हायपोथायरॉईड) किंवा गरम सहन न होणे (हायपरथायरॉईड).
नैराश्य, झोपेच्या समस्या.
डॉक्टरांचा सल्ला महत्त्वाचा (ऊेर्पीीश्री र ऊेर्लीी)
थायरॉईडचे आजार (हायपोथायरॉईडीझम, हायपरथायरॉईडीझम) आयुष्यभर राहू शकतात आणि त्यावर औषधोपचार सुरू ठेवावा लागतो.
स्वयंप्रतिकार रोग (-ींळा-ीपश वळीशरीशी) जसे की हाशिमोटो (क्रीहळोींपि) किंवा ग्रेव्हज (त्रीरींशीफ वळीशरीश) ही थायरॉईडच्या समस्यांची प्रमुख कारणे आहेत.
स्वत:च्या मनाने कोणतेही उपचार करू नका. योग्य निदानासाठी आणि उपचारांसाठी एंडोक्राइनोलॉजिस्ट (एप-वेलीळपेश्रेसळीीं) किंवा डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# वजन कमी करण्यासाठी मखान्याचे सेवन करा

आयुर्वेदात मखाने वात, पित्त आणि कफ यांचे संतुलन राखण्यास मदत करते. त्याचे सेवन केल्याने वजन वाढणे लवकर थांबते.बदलत्या जीवनशैलीमुळे, अनेक लोकांमध्ये वाढत्या लठ्ठपणाचा अनुभव येत आहे. परिणामी, लोक हलके आणि शरीराला आवश्यक ऊर्जा प्रदान करणारे पौष्टिक पदार्थ शोधत आहेत. या बाबतीत मखाना हा एक उत्तम पर्याय आहे. ते केवळ वजन कमी करण्यास मदत करत नाही तर अनेक शारीरिक समस्या देखील दूर करू शकते.
हिवाळ्यात वजन झपाट्याने कमी करण्यासाठी हे सोपे खास घरगुती उपाय करा
वजन कसे कमी करावे?
आयुर्वेदानुसार, मखाना पौष्टिक आहे. ते शरीराला ऊर्जा प्रदान करते. शिवाय, त्याचे गुणधर्म पचन संतुलित करतात, अतिरिक्त चरबी जमा होण्यास कमी करतात. आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये माखाना शरीराची कमकुवतपणा आणि वृद्धत्वाचे परिणाम कमी करण्यासाठी उत्तेजक म्हणून वर्णन केले आहे . ते शरीराचे पोषण करते, पोट हलके ठेवते आणि त्यातील फायबर सामग्रीमुळे भूक नियंत्रित करते.
मखान्याचे गुणधर्म
वैज्ञानिक संशोधनानुसार, मखाना हा कमी कॅलरी आणि उच्च प्रथिनेयुक्त नाश्ता आहे जो वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. त्यात चरबी कमी असते परंतु फायबर



भरपूर असते. शास्त्रज्ञ असेही म्हणतात की मखाना कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह, प्रथिने आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. हे पोषक घटक ते केवळ हलके आणि पचण्यास सोपे बनवत नाहीत तर शरीराच्या चयापचयाला गती देतात
-डडज ठए-ऊ हिवाळ्यात उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी या पदार्थांचा समावेश करा
मखाना वजन कमी करण्यास अनेक प्रकारे मदत करते. त्यातील फायबरचे प्रमाण जास्त काळ पोट भरल्यासारखे राहण्यास मदत करते, भूक लागणे टाळते आणि कॅलरीजचे सेवन कमी करते. मखानामध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, म्हणजेच ते हळूहळू ऊर्जा सोडते आणि रक्तातील साखरेमध्ये अचानक वाढ होण्यास प्रतिबंध करते. जेव्हा रक्तातील साखर स्थिर राहते तेव्हा शरीरात इन्सुलिनचे चढउतार कमी होतात, ज्यामुळे चरबी साठवण्याची प्रक्रिया मंदावते.
मखान्याच्या बियांमधील अँटीऑक्सिडंट्स शरीरातील जळजळ कमी करतात, कारण जुनाट जळजळ बहुतेकदा वजन वाढण्यास कारणीभूत असते. जेव्हा जळजळ कमी होते तेव्हा चयापचय चांगले कार्य करते, ज्यामुळे चरबी जाळणे सोपे होते.
१५ किलो वजन कमी करण्याचे १५ पद्धती, कठिण नाही नक्की करुन बघा
फायदे
वजन कमी करण्यासोबतच, मखाना अनेक आजारांपासून आराम देतो. मखानामधील मॅग्नेशियमचे प्रमाण हृदयाचे आरोग्य मजबूत करते आणि रक्तदाब नियंत्रित करते. त्याचे अँटीऑक्सिडंट गुणधर्म शरीराला मुक्त रॅडिकल्सपासून वाचवतात, ज्यामुळे वृद्धत्वाची लक्षणे दिसण्यास विलंब होतो. मखाना मधुमेहींसाठी देखील फायदेशीर आहे, कारण ते रक्तातील साखरेची पातळी स्थिर करते. आयुर्वेदानुसार, ते मूत्रपिंडांना मजबूत करते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.
अस्वीकरण (ऊळीलश्रराळाशी) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत वेबदुनिया कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# पुतीन यांच्या भेटीचा मथितार्थ

आंतरराष्ट्रीय राजकारणात ऑप्टिक्सला प्रचंड महत्त्व असते. भारत आणि रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांच्या भारत दौऱ्यात भारताने हाच संदेश जगाला देण्याचा प्रयत्न केला आहे. पुतिन यांची भारत भेट ही समारंभपूर्वक दिखाऊपणाच्या अगदी पार पलीकडे जाणारी आणि दोन्ही देशांत असलेल्या अनेक वर्षांपासूनच्या संबंधांना आणखी बळकट करणारी आहे. अमेरिका आणि त्यांच्या मांडलिक देशांनी पुतिन यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळे पाडण्याचा प्रयत्न केल्यानंतरही मोदी यांनी पुतिन यांचे स्वागत केले आणि त्यातून हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला, की ध्रुवीकृत जागतिक वातावरणात भारताची भूमिका बदललेली नाही. अलिप्तता चळवळ ही आपली अगोदर प्रमुख होती, पण तिसऱ्या देशाची ताकद जशी क्षीण होत गेली तशी त्या चळवळीचे महत्त्व ओसरू लागले. हे ओळखून भारताने अलिप्तता चळवळीकडे पूर्ण दुर्लक्ष न करताही भारताचे कोणत्याही राष्ट्राच्या आहारी न जाण्याचे आणि कुणालाही फारसे जवळ येऊ न देण्याचे धोरण कायम ठेवले. पुतिन यांच्या या भारत भेटीत दोन्ही देशांनी १६ सामंजस्य करार केले आणि त्यात संरक्षण, शिक्षण आणि ऊर्जा विषयक करारांचा समावेश होता. त्याचबरोबर २०३० पर्यंतचा रोडमॅप तयार करण्यात आला.
ही भेट महत्त्वाची होती. कारण लाक्षणिक अर्थाने हे निश्चित करण्यात आले, की जागतिक अस्थिरता आणि अशांतता असतांनाही भारत आणि रशिया यांच्यातील मैत्री ही विश्वास आणि परस्परविषयक आदराची जपणूक करणारी आहे. या भेटीनंतर उभय देशांनी जाहीर केले, की पुतीन आणि मोदी यांच्यातील भेटीतून द्विपक्षीय सहकार्य केवळ मजबूत झाले आहे. भारताच्या मित्रत्वाच्या बाजूने रशिया प्रथमपासूनच होता आणि अमेरिकेच्या दादागिरीला भारताचे नेतृत्व झुकले नाही, तेव्हाही रशियाच भारताच्या मदतीला धावून आला होता. आता बंगालच्या उपसागरात अमेरिकेने कशा आपल्या युद्धनौका आणल्या होत्या आणि रशियानेच भारताला त्यावेळी वाचवले होते. हा सारा इतिहास झाला. पण तेव्हापासून भारताचा खंदा मित्र म्हणून रशिया उभा आहे. पुतीन यांच्या भारत भेटीचे सर्वात महत्त्वाचे फलित म्हणजे भारतीय फार्मा कंपन्यांना रशियाने उत्पादन करण्यास परवानगी दिली आहे हाच आहे. रशियासाठी भारताची औषधे ही विश्वासार्हता प्रदान करतात आणि भारतासाठी यामुळे भारतीय औषधांची नागरिकांच्या जीवितासाठी महत्त्वपूर्ण बाब म्हणून ओळख मजबूत करते. भारत आणि रशिया यांच्यातील सहकार्याच्या करारामुळे दोन्ही देशांच्या संयुक्त युरिया उत्पादन सुविधांच्या भारतात प्रस्थापित होण्याला चालना मिळणार आहे. त्यामुळे भारताची शेती क्षेत्रात प्रगती होणार आहे. यामुळे अपरिहार्यपणे भारताला होणारा फायदा म्हणजे भारताची आयातीवरील अवलंबितता कमी होईल. अगोदरच भारताची आयात जास्त आहे आणि निर्यात कमी आहे. त्यामुळे आयात-निर्यात समतोल ढासळतो. तो या निर्णयामुळे बराचसा कमी होईल. पुतीन यांनी भारत आणि रशिया यांच्यातील संस्कृतिक संबंधांची आठवण काढताना अभिनेते राज कपूर यांची आठवण काढली आणि त्यामुळे दोन्ही देशांत सांस्कृतिक आदान-प्रदान किती महत्त्वाची चालली होती आणि किती प्रदीर्घ काळापासून चालत आली आहे याचे स्मरण झाले. ही भागीदारी बहुध्रुवीय जगात नुसती महत्त्वाची नाही, तर चेन्नई व्लादिवोस्तोक मॅरिटाईम कॉरिडोरद्वारे सर्वात भू-राजकीय परिणाम दिसून आला आहे. याचा



संबंध तामिळनाडूनतील कोडाईकुलम आणि रशियातील व्लादिवोस्तोक कॉरिडोरमुळे उभय देशांतील प्रवासाचा काळ महत्त्वपूर्ण कमी होणार असून नव्या पुरवठा लाईन्स सुरू होतील. चीनविरोधात भारत एकीकडे इंडो पॅसिफिक सागरात झुंज देत असताना या नव्या कॉरिडोरमुळे भारताला रशियाच्या अति पूर्वेतील प्रयत्नांना साथ देता येऊ शकेल. हा केवळ आर्थिक प्रकल्प नाही, तर भारताची सागरी आणि युरेशियन कनेक्टिव्हिटी वाढवणारा प्रकल्प आहे.
मोदी-पुतीन यांची भेट ही केवळ स्वतंत्र राजनैतिक भेट नव्हती, तर निश्चित करणारा माईलस्टोन होता. ज्याचे जागतिक परिणाम मजबुती, स्थैर्य आणि नागरी व्यवस्थेत होतील. शीतयुद्धकालीन परिस्थिती झपाट्याने बदलत आहे आणि त्या परिप्रेक्ष्यात या भेटीकडे पाहिले पाहिजे. जग आज मल्टीपोलर होताना भारताला अमेरिकेवरच आपले ध्यान लावून बसणे शक्य नव्हते. पुतीन ही कितीही पाश्चात्य राष्ट्रांनी आव आणला तरीही दुर्लक्षणीय शक्ती नाही. हे ओळखून नरेंद्र मोदी यांनी पुतीन यांची भारत भेट आयोजित केली आणि त्यातून अमेरिकेला संदेश दिला, की ट्रम्प यांच्यापासून वेगळे मार्ग शोधावे लागतील. भारत आणि रशिया यांच्या एकत्र येण्यामुळे अमेरिका अस्वस्थ होणे साहजिक आहे. अगोदर जी-२० परिषदेत मोदी यांनी जाऊन दक्षिण आफ्रिकेला ट्रम्प नसले तरीही जी-२० यशस्वी होऊ शकते असा संदेश दिला आणि आता पुतीन यांच्या भारत भेटीमुळे दुसरा दणका दिला आहे. कारण ट्रम्प यांच्या टॅरिफच्या धोरणामुळे भारतात अस्वस्थता आहे. त्यावर उत्तर भारताला शोधावेच लागणार आहे आणि त्यात रशियाची मदत घेतली, तर कुठेच बिघडले नाही. भारत रशिया संबंधांना नवी दिशा मिळाली आहे हे निश्चित आहे. परराष्ट्र संबंधांना बिटवीन लाईन्सला महत्त्व असते. जे सांगितले त्यापेक्षा जे नाही ते सांगितले ते जास्त महत्त्वाचे असते. मोदी आणि पुतीन यांच्या भेटीकडे याच परिप्रेक्ष्यातून पाहावे लागेल. रशिया-युक्रेन युद्धामुळे रशिया एकटे पडल्याची भावना निर्माण झाली होती. ती मोदी-पुतीन यांच्या भेटीमुळे बऱ्याच प्रमाणात दूर होण्यास मदत होईल. अर्थातच पुतीन यांचे भव्य स्वागत केल्यामुळे अमेरिका आणि पाश्चात्य जग अस्वस्थ झाले आहे. पण मोदी यांनी पुतीन यांचे स्वागत करून पाश्चात्य देशांच्या दबावाला बळी पडणारे आपण नाही हे सिद्ध केले. त्यात भारताचा लाभ झाला आहे. त्यामुळे अमेरिकेचा थयथयाट समजण्यासारखा आहे. पुतीन यांच्या भारत भेटीचा निष्कर्ष असा काढता येईल, की त्यामुळे भारत-रशिया संबंधांची दृढता, सामरिक भागीदारीचे नूतनीकरण आणि संरक्षण याचे जागतिक भू-राजकीय मुद्यांवर सहकार्याची पुष्टी देण्यात आली. पुतीन यांची भारत भेट ट्रम्प यांच्यासाठी निश्चितच आश्वासक नाही.

## आहारातून टाळा हृदयरोग

### डॉक्टर टीप्स

मटन किंवा मांसाहारी पदार्थातील लिवर किडनी असे भाग टाळावेत. आहारात सोयाबीनचाही उपयोग करता येईल. तसेच दूध व दुधाचे पदार्थ जसे दही किंवा पनीर तयार करताना साय काढून केल्यास उत्तम.
तेल-तूप : हृदयरोग म्हटल्यावर आपल्या सर्वांना माहिती आहे की, रक्तवाहिनीत चरबी साठून रक्त प्रवाहास अडथळा निर्माण झाल्यास हार्ट ॲटॅक येऊ शकतो. हा धोका टाळण्यासाठी योग्य प्रमाणातच आहारात तेल व तुपाचा समावेश करावा. प्रमाणाव्यतिरिक्त कुठले तेल वापरतो यानेदेखील



फरक पडतो. आपल्या एकूण कॅलरीजच्या गरजेपैकी साधारणत: वीस टक्के स्निग्ध पदार्थातून म्हणजे तेल व तूपातून आल्या पाहिजेत. सामान्य तापमानात फ्रीजमध्ये न ठेवता जे तेल गोठते ते हृदयासाठी चांगले नाही जसे वनस्पती तूप किंवा बटर. वेगवेगळ्या तेलबियांमधील चांगले गुण आपल्याला मिळण्यासाठी वेगवेगळ्या तेलबियांचे तेल बदलून वापरले पाहिजे. जसे करडई, शेंगदाणा, सूर्यफुल, ऑलिव्ह या व्यतिरिक्त आहारात जवस, बदाम व अक्रोड घेतल्यास यातून मिळणारे तेल हृदयासाठी खूप फायदेशीर असते. **(क्रमश:)**

## विनोद




आगगाडीत तिकीट तपासणीस येतात. एक प्राध्यापक तिकीट शोधतात. खूप वेळ होतो. अखेर तपासणीस म्हणतात, 'जाऊ द्या. नका शोधू. मला खात्री आहे, तुम्ही तिकीट काढले असणार.' त्यावर प्राध्यापक म्हणतात, 'तरी मला शोधायलाच हवे, कारण उतरायचे कुठे ते कसे कळणार.'

## संदेश

Old : pehla pehla pyar hai, aayi bahar hai, aaja more sajan tera Intazar hai.
New : Duja teja pyar hai, dil bekarar hai, aaja mere sajana verna Chautha taiyaar hai…!

## सुविचार



चूक ही चिवट वनस्पती आहे, ती वाटेल त्या भूमीत फोफावते.
- मार्टिन रूपर

**संस्कृत सुभाषित**
मित्रं वा बन्धुं वा वैवातिप्रणयपीडितं कुर्यात।
स्वम वत्समतिपिबन्तं विषाण कोट्याक्षिपति धेनु:।।
अर्थ : मित्राच्या किंवा आप्ताच्या प्रेमाचा फार फायदा घेऊ नये. स्वत:चे वासरू जर जास्त दूध पिऊन त्रास देत असेल तर गाय स्वत: त्यालाही शिंगानी ढोसून दूर करते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. डोंगरराजीतील साहसी पर्यटन
४. गुणज्ञ
८. वक्र
११. पानाचे दुकान
१२. अफूचे बी
१४. महिना
१५. पहारेकरी
१८. विपुलता
२०. हस्तेपरहस्ते
२२. जिवलग मैत्रिण
२३. निकट
२५. रडगाणे, रडकथा
२६. अरण्य
२८. वृक्ष
३०. होडी चालवणारा
३२. किल्ली
३४. घनिष्ठ संबंध
३६. समुद्राच्या लाटांचा आवाज
३८. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे नियतकालिक
३९. '-- जनाब ने पुकारा नहीं, क्या मेरा साथ भी गंवारा नहीं'
४०. मीठ
४१. थोडेसे
४२. जन्मदाता
४३. हेतू, कारण, स्वार्थ
४५. रेती
४६. विष्णुपत्नीचे एक नाव
४८. वर्ष, साल
४९. लिंबूसाखरेचे थंड पेय
५२. अंगावर येणारा काटा
५४. पादत्राण
५५. गहन
५६. स्वर्गाचे दोन पहारेकरी
५८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६०. घास पण गवत नव्हे
६१. एक चतुर्थांश
६२. व्रत, नेम
६४. उदर
६५. जयघोष
६७. अनुमती
६९. सुंभाबरोबर न जळणारा
७१. मोठा जाड अंगरखा
७२. तांब्या-पितळेची भांडी तयार करणारा
७४. '-- ---- म्हणतील हाय, हाय! मी जाता राहील कार्य काय?' (भा.रा.तांबे)
७७. गवंडी
७८. अचेतन शरीर
७९. पार्वतीचे उग्र रूप
८०. वशिला
८१. सोशिकपणा

## उभे शब्द

१. आस्था, फिकीर
२. तारणारा
३. आयुध
४. मद्य तयार करणारा-विकणारा
५. रुक्ष
६. सेवक
७. लचकत-मुरडत अशी चाल अथवा चालणारी
९. जास्तीतजास्त
१०. मच्छर
११. जपून ठेवलेली गोष्ट
१३. अखंड
१६. मोठे भांडण
१७. राममंदिरातील मारुतीचे रूप
१९. जीव, प्राण, चैतन्य
२०. चलनवलन
२१. अति खाण्यामुळे पोटाला बसणारी ओढ
२४. उगीच
२७. आवर घालणारी वादी
२९. शंभर पैशाचे नाणे
३१. प्रवाशांना घेऊन अधांतरी उडणारे
३३. डोंगरातील लांब गुहावजा जागा
३५. खुमारी
३७. उष्णतेमुळे पायाला भेगा पडण्याचा रोग
४१. आकाश
४२. पाण्याचा साठा असलेली जागा
४३. अंत:करण
४४. हावरटपणा
४७. इंद्रिय
४८. हुक्की, लहर
५०. मजबूत, भक्कम
५१. चरण
५३. राजसुख
५५. डोक्याला झालेली खोल जखम
५६. मनातली आग
५७. स्थानापन्न (होणे)
५९. उत्सवाचे दिवस
६१. चबुतरा
६३. भेग, चीर
६६. अंजन
६८. रविंद्रनाथ टागोरांचा काव्यसंग्रह
७०. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या आपण सगळेच
७१. नाजूक,७३. पत्र
७४. एक गळित धान्य,७५. वारा
७६. यज्ञ
७७. पौर्णिमा

## आडवे उत्तरे

१.पर्वतारोहन ४.कदरदान ८.वाकडा
११.ठेला १२.खसखस १४.मास १५.रखवालदार
१८.रेलचेल २०.हातोहात २२.सखी
२३.लगत २५.रड २६.जंगल २८.तरू
३०.नाविक ३२.चावी ३४.सलगी ३६.गाज
३८.पाक्षिक ३९.माना ४०.लवण ४१.अंमळ
४२.जनक ४३.मतलब ४५.वाळू ४६.कमला
४८.सन ४९.सरबत ५२.शहारा ५४.वहाण
५५.खोल ५६.जयविजय ५८.कसकस
६०.कवळ ६१.पाव ६२.वसा
६४.पोट ६५.जयजयकार ६७.परवानगी ६९.पीळ
७१.कोट ७२.तांबट
७४.जन पळभार ७७.राज ७८.शव
७९.महाकाली ८०.लग्गा ८१.सहनशीलता

## उभे उत्तरे

१.पर्वा २.तारणहार ३.हत्यार ४.कलाल
५.रखरखीत ६.दास ७.नखरेल ९.कमाल
१०.डास ११.ठेवा १३.सलग
१६.खडाजंगी १७.दास १९.चेतना
२०.हालचाल २१.तडस २४.हकनाक २७.लगाम
२९.रुपाया ३१.विमान ३३.विवर ३५.लज्जत
३७.जळवात ४१.अंबर ४२.जलाशय ४३.मन
४४.लसलस ४७.अवयव ४८.सणक ५०.बळकट
५१.पाय ५३.राणीव ५५.खोक ५६.जळजळ
५७.विराजमान ५९.सणवार ६१.पार ६३.सापट
६६.काजळ ६८.गीतांजली ७०.करदाता
७१.कोमल ७३.टपाल ७४.जवस ७५.पवन
७६.होम ७७.राका



# क्रीडा विश्व



यूकेतील लीड्स येथे इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉल सामन्यात भाग घेताना लीड्स युनायटेड आणि लिव्हरपूलचे खेळाडू.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### सातव्या कॅरम वर्ल्डकप स्पर्धेत भारताचा दबदबा

कोल्हापूर-कॅरमपटावर आपल्या अचूक खेळीनं आणि शांत, संयमी स्वभावानं प्रतिस्पर्धंयांना चकवणारा कोल्हापूरचा अभिजित त्रिपणकर जागतिक मंचावर पुन्हा एकदा झळकला आहे. मालदीव इथं २ ते ६ डिसेंबर दरम्यान झालेल्या सातव्या कॅरम वर्ल्डकपमध्ये अभिजितनं दुहेरी (डबल) प्रकारात भारताला विश्वविजेतेपद मिळवून दिलं. त्याचबरोबर एकेरी गटात तृतीय स्थान आणि टीम प्रकारात आणखी एक सुवर्ण मिळवत कोल्हापूरचा क्रीडा गौरव जागतिक स्तरावर उंचावला आहे. कशी झाली लढत : कोल्हापूर शहरातील मंगळवार पेठ-शिंगोशी मार्केट परिसरातील रहिवासी असलेला अभिजित सध्या पुण्याच्यावतीनं राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भारताचं प्रतिनिधित्व करतो. कॅरम वर्ल्डकप स्पर्धेसाठी त्याची भारतीय संघात निवड झाल्यापासूनच कोल्हापूरमधून अपेक्षांची मोठी लाट पाहायला मिळत होती आणि अभिजितने त्या संधीचा पुरेपूर फायदा घेत आपल्या नेमक्या खेळाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. दुहेरी प्रकारात अभिजित त्रिपणकर आणि के. श्रीनिवास या जोडीने प्रारंभापासूनच दमदार कामगिरी केली. त्यामुळं कोल्हापूरच्या प्रत्येक क्रीडापटूची छाती गर्वानं फुलून गेली आहे.

### विराटचा मास्टरस्ट्रोक! द.आफ्रिका सीरिजनंतर याची साथ सोडली

दिल्ली-भारताचा दिग्गज क्रिकेटर विराट कोहलीने दक्षिण आफ्रिका विरुद्ध वनडे सीरिजमध्ये दमदार कामगिरी करत दोन शतक तर एक अर्धशतक ठोकलं. दक्षिण आफ्रिका वनडे सीरिज संपल्यावर आता त्याने देशातील स्पोर्ट्सवियर कंपनी एजिलिटास स्पोर्ट्स सोबत नवी पार्टनरशिप केली आहे. विराट कोहलीने काही दिवसांपूर्वी प्यूमा ब्रँड सोबत आपली कोट्यवधींची डील संपवली. विराट कोहलीने केवळ ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून गुंतवणूक करण्यापेक्षा या कंपनीत जास्त गुंतवणूक केली आहे. असे सांगितले जातेय की विराटने जवळपास ४० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे त्याला कंपनीत १.९४म हिस्सा मिळेल. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक्सवर पोस्ट शेअर करून त्याने नव्या पार्टनरशिपची माहिती दिली. कोहलीने पोस्टम ध्ये म्हटले, मआज माझ्या हृदयाच्या अगदी जवळची एक नवीन सुरुवात आहे. जपश८ आणि असळश्रळींरी साठी एक नवीन प्रवास सुरू होतोय. मजबूत ध्येये आणि मोठ्या स्वप्नांनी प्रेरित होऊन, मी जपश८ मध्ये त्यांच्या नवीन घर, असळश्रळींरी मध्ये सामील होत आहे.
व्हायरल व्हिडीओमध्ये विराट हा एगिलिटास बाबत बोलत होता.

### आयसीसी ची टीम इंडियावर दंडात्मक कारवाई

दिल्ली-रोहित शर्मा व विराट कोहली यांच्या उत्कृष्ट काम गिरीच्या बळावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरूद्धची वनडे मालिका नावे केली. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली. विराट कोहलीने या वनडे मालिकेत सर्वाधिक धावा करत मालिकावीर होण्याचा मान पटकावला. आयसीसीने आता भारतीय संघाला शिक्षा सुनावली आहे. वनडे मालिकेतील पहिला सामना भारताने १७ धावांनी जिंकला. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पुनरागमन केलं आणि सामना चार विकेट्सने जिंकला. यानंतर, भारताने तिसरा आणि शेवटचा सामना ९ विकेट्सने जिंकला आणि मालिका आपल्या नावे केली. मॅच रेफरी रिची रिचर्डसन यांनी भारतीय संघावर दंड आकारला आहे. रायपूरमध्ये झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात स्लो ओव्हर रेटसाठी आयसीसीने भारतीय संघाला मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावला आहे. भारतीय क्रिकेट संघाने निर्धारित वेळेपेक्षा दोन षटकांनी मागे होता. आयसीसी एलिट पॅनेल मॅच रेफरी रिची रिचर्डसन यांनी केएल राहुलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघावर हा दंड ठोठावला.

### त्या दोघांना विजय हजारे ट्रॉफी खेळायला भाग पाडले?

दिल्ली-भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका गमावल्यानंतर एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली. या मालिकेत विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विराट कोहली दक्षिण आफ्रिकेविरूद्ध वनडे मालिकेचा मालिकावीर ठरला. तर रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेत उत्कृष्ट कामगिरी करत मालिकावीर पुरस्कार पटकावला होता. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीदरम्यान रोहित-विराट विजय हजारे ट्रॉफी खेळणार आहेत.विराट कोहलीने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध वनडे मालिकेत १५१ च्या सरासरीने ३०२ धावा केल्या, ज्यात दोन शतकं आणि एक अर्धशतकाचा समावेश आहे, तर रोहित शर्माने दोन अर्धशतकांसह १४६ धावा केल्या. आता हे दोन्ही दिग्गज खेळाडू नवीन वर्षात न्यूझीलंडविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळताना दिसतील.

# रोहित विराटला देशांतर्गत क्रिकेट खेळण्यास भाग पाडले?

मुंबई-भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली. भारतीय संघाच्या मालिका विजयात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विराट कोहलीने १५१ च्या सरासरीने ३०२ धावा केल्या, ज्यामध्ये दोन शतके आणि एक अर्धशतक समाविष्ट आहे. सलामीवीर रोहित शर्माने १४६ धावा केल्या. रोहितने ४८.६६ च्या सरासरीने धावा केल्या आणि दोन अर्धशतके केली. विराट कोहली आणि रोहित शर्मा आता जानेवारीमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत खेळताना दिसतील. तथापि, त्यापूर्वी, दोन्ही अनुभवी खेळाडू विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ मध्ये त्यांच्या संबंधित देशांतर्गत संघांसाठी खेळतील, ज्याची अधिकृत पुष्टी झाली आहे. दोघेही गेल्या दोन महिन्यांत उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. रोहितने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत मालिकावीराचा पुरस्कार जिंकला, तर कोहलीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत हाच पुरस्कार जिंकला.
गेल्या काही महिन्यांपासून, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या एकदिवसीय क्रिकेट भविष्याबद्दल बरीच चर्चा सुरू आहे, ज्याला या दोन्ही दिग्गजांनी त्यांच्या फॉर्मने शमवले आहे. ऑस्ट्रेलिया मालिकेपूर्वी, असे वृत्त समोर आले की जर रोहित आणि कोहली २०२७ च्या एकदिवसीय



## बीसीसीआयने अखेर मौन सोडले!

विश्वचषकात खेळण्याची इच्छा बाळगतात तर त्यांनी विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळले पाहिजे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीतील पराभवानंतर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) केंद्रीय कराराखालील खेळाडूंना वेळ आणि वेळापत्रक परवानगी देईल तेव्हा देशांतर्गत क्रिकेट खेळणे बंधनकारक केले आहे.
बीसीसीआयने त्यांना सक्ती केली का?
तथापि, रेव्हस्पोर्ट्झच्या अहवालानुसार, बीसीसीआयने विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना देशांतर्गत क्रिकेट खेळण्यास भाग पाडले नाही. जेव्हा बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याला विचारण्यात आले की बोर्डाने या दोन्ही वरिष्ठ खेळाडूंना विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळण्यास सांगितले आहे का, तेव्हा त्यांनी ते स्पष्टपणे नाकारले. बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने सांगितले, मफ्त्यांनी स्वत:हून निर्णय घेतला आहे; हा त्यांचा निर्णय आहे.फ्फ
रोहित शर्मा मुंबईकडून खेळेल
रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघांनीही या वर्षी जानेवारीमध्ये रणजी ट्रॉफी सामना खेळला होता. तथापि, इंग्लंड दौऱ्यापूर्वी मे महिन्यात दोघांनीही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. काही दिवसांपूर्वी विराट कोहलीने दिल्ली जिल्हा क्रिकेट असोसिएशन (डीडीसीए) ला विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळणार असल्याचे कळवले. डीडीसीएचे अध्यक्ष रोहन जेटली यांनीही याची पुष्टी केली. वृत्तानुसार, २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफीम ध्ये रोहित शर्मा मुंबईकडून खेळेल.मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर काय म्हणाले?
टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी अद्याप स्पष्ट केलेले नाही की रोहित आणि कोहली २०२७ च्या विश्वचषकात खेळतील की नाही. गंभीर म्हणाले, मफ्दोघेही जागतिक दर्जाचे खेळाडू आहेत आणि त्यांचा अनुभव संघासाठी खूप महत्त्वाचा आहे. आशा आहे की, ते असेच कामगिरी करत राहतील.फ्फ गंभीरचा असा विश्वास आहे की सध्या विश्वचषकाबद्दल विचार करण्याऐवजी, वर्तमानावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे आणि तरुण खेळाडूंनीही संधीचा फायदा घ्यावा.

# आयपीएलमध्ये विदेशी खेळाडूंना मिळणार केवळ १८ कोटी!

लिलावापूर्वीच बीसीसीआयच्या नियमांचा अनेक खेळाडूंना फटका
मुंबई : आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावाची सध्या तयारी चालू आहे. आगामी आयपीएल लिलाव १६ डिसेंबरला होणार आहे. पुढील लिलावापूर्वी, बीसीसीआयने विदेशी खेळाडूंसाठी एक नवीन नियम लागू केला आहे, ज्यामुळे मिनी-लिलावात विकल्या जाणाऱ्या खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आता मिनी लिलावात मोठी कमाई करणाऱ्या खेळाडूंसाठी एक वेगळा नियम आणला आहे.
आयपीएल स्पर्धेत विदेशी खेळाडूंनी अचानक माघार घेऊ नये आणि तसे केल्यास त्यांच्यावर दोन वर्षांची बंदी लागू शकते, असा निर्णय गेल्यावर्षी आणला गेला. खेळाडूंनी स्पर्धेतून अचानक माघार गेल्याचा परिणाम फ्रँचायझींवर झाल्याची तक्रार मालकांनी केली होती. त्यानंतर बीसीसीआयने हे पाऊल उचलले. यानंतर आता विदेशी खेळाडूंसाठी एक नवा नियम समोर आला आहे.
काही विदेशी खेळाडू महालिलावात भाग घेणे टाळतात. त्याऐवजी, ते मिनी लिलावात त्यांची नावे सादर करतात. खरे तर, महालिलावामध्ये फ्रँचायझी त्यांचे संघ तयार करण्यासाठी करतात. या छोट्या लिलावात, फ्रँचायझी त्यांच्या संघातील रिक्त जागा भरून काढण्याचा प्रयत्न करतात. यामुळे, ते स्टार विदेशी खेळाडूंवर कोट्यवधी रुपये



खर्च करतात. सर्व फ्रँचायझींनी याबद्दल बीसीसीआयकडे तक्रार केली आहे. आता बीसीसीआयने असा नियम केला आहे की विदेशी खेळाडूंना मिनी लिलावात १८ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम मिळू शकणार नाही. समजा जर खेळाडूंवर २५ ते ३० कोटींची बोली लागली तरी त्यांना फक्त १८ कोटी रुपये पगार मिळेल

# इतिहासाची पुनरावृत्ती करण्याची विराटला ७ वर्षांनी संधी

मुंबई : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना ६ डिसेंबर रोजी विशाखापट्टणम येथे खेळला जाणार आहे. मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत असल्याने दोन्ही संघांसाठी हा सामना 'करो या मरो'चा आहे. या सामन्यात सर्वांचे लक्ष विराट कोहलीवर असेल. सलग दोन सामन्यांमध्ये शतके झळकावून विराट कोहलीने हे सिद्ध केले आहे की फॉर्ममध्ये असताना जगातील कुठलाही गोलंदाज त्याच्यापुढे फिकाच पडतो. तशातच मालिकेतील शेवटच्या सामन्यात विराटला सात वर्षांपूर्वीचा पराक्रम पुन्हा करण्याची संधी आहे.विराट कोहलीने मालिकेची सुरुवात १३५ धावांच्या शानदार खेळीने केली होती. त्यामुळे भारतीय संघाला विजय मिळाला. दुसऱ्या सामन्यातही त्याने १०२ धावांचे शतक झळकावले, पण संघाला पराभव पत्करावा लागला. सलग दोन शतकांसह तो आता अशा टप्प्यावर आहे, जिथे आणखी एक शतक त्याला क्रिकेट इतिहासात एक खास स्थान मिळवून देईल. त्याच्याकडे एकदिवसीय क्रिकेटमध्ये शतकांची हॅटट्रिक करण्याची संधी आहे.

# ...तर मुख्य प्रशिक्षकपदावरुन काढून टाकण्यात येईल; शास्त्रींचा गंभीरला इशारा

मुंबई-भारताने दक्षिण अफ्रिकेविरुद्धची कसोटी मालिका गमावल्यानंतर अनेकांनी टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर टीका केली होती. गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली भारताने १८ पैकी १० कसोटी सामने गमावले आहेत, ज्यात गेल्या वर्षी न्यूझीलंडविरुद्ध आणि आता घरच्या मैदानावर दक्षिण अफ्रिकेविरुद्ध पराभवाचा समावेश आहे. भारताच्या या कामगिरीवरुन गौतम गंभीरवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. याचदरम्यान आता भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू आणि माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी एका पॉडकास्टमध्ये मोठं विधान केलं आहे. एका व्यक्तीला लक्ष्य करणे योग्य नाही, असं रवी शास्त्री म्हणाले.
लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की खेळाडूंनीही जबाबदारी घेतली पाहिजे. तुम्ही एकाच व्यक्तीला लक्ष्य करू शकत नाही. माझ्यासोबत असे घडले आहे, म्हणून मी माझा अनुभव सांगतोय. जेव्हा असे काही घडते तेव्हा खेळाडूंनीही त्यांच्या चुका स्वीकारल्या पाहिजेत. खेळाडूंना अशी भावना असली पाहिजे की आपण पराभवाला सामोरे गेलो आहोत आणि आपण त्यातून चांगले होऊ. जोपर्यंत हे घडत नाही तोपर्यंत गोष्टी पुढे जाणार नाहीत, असं रवी शास्त्रींनी सांगितले. दरम्यान, विराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोघेही एकदिवसीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू आहेत. त्यांच्यासोबत तुम्ही पंगा घेऊ नका, त्यांनी एक बटण दाबलं की आजूबाजूचे सगळे गायब होतील, असंही रवी शास्त्री

# भारत आणि दक्षिण आफ्रिका पहिला टी-२० सामना किती वाजता सुरू होणार? जाणून घ्या

दिल्ली-कसोटी आणि एकदिवसीय मालिकेनंतर आता भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या दोन्ही संघांमध्ये ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. टी-२० विश्वचषक २०२६ च्या दृष्टीने ही मालिका दोन्ही संघांसाठी फायदेशीर असणार आहे. ८ फेब्रुवारी २०२६ पासून भारत आणि श्रीलंका येथे टी-२० विश्वचषकाला सुरूवात होणार आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला टी-२० सामना किती वाजता सुरू होणार, जाणून घेऊया.
भारतीय संघाचं नेतृत्त्व सूर्यकुमार यादव करणार आहे, तर एडन मारक्रमच्या खांद्यावर दक्षिण आफ्रिकेच्या संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी असणार आहे.
कसोटी मालिका २-० ने गमावल्यानंतर भारताने २-१ च्या फरकाने वनडे मालिका आपल्या नावे केली. यानंतर आता टी-२० मालिकेत संघ कशी कामगिरी करणार, यावर सर्वांच्या नजरा असतील.
भारत आणि दक्षिण आफ्रिका पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळवली जाणार आहे. मालिकेतील पहिला सामना मंगळवार, ९ डिसेंबरला कटकमध्ये खेळवला जाणार आहे.
दुखापतीनंतर संघाचा उपकर्णधार शुबमन गिल टी-२० मालिकेसाठी फिट होत संघात परतला आहे. तर हार्दिक पंड्यादेखील आशिया चषकानंतर मैदानावर पहिल्यांदा खेळताना दिसणार आहे.
भारत आणि दक्षिण आफ्रिका मालिकेतील पहिला सामना संध्याकाळी ७.०० वाजता खेळवला जाणार आहे. तर नाणेफेक संध्याकाळी ६.३० वाजता होईल.
भारतात टी-२० मालिका खेळवली जाणार असल्याने मालिकेतील सर्व सामने संध्याकाळीच खेळवले जातील. तर स्टार स्पोर्ट्सवर या टीव्ही चॅनेलवर सामना लाईव्ह पाहता येणार आहे, तर जिओ हॉटस्टारवर मालिकेचं लाईव्ह स्ट्रीमिंग पाहायला मिळेल.
भारताचा टी-२० मालिकेसाठी संपूर्ण संघ
सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, हर्षित राणा, वॉशिंग्टन सुंदर
दक्षिण आफ्रिकेचा टी-२० मालिकेसाठी संपूर्ण संघ
एडन मारक्रम (कर्णधार), डेवाल्ड ब्रेविस, टोनी डी झोर्झी, रीझा हेंड्रिक्स, डेव्हिड मिलर, जॉर्ज लिंडे, कॉर्बिन बॉश, मार्को यान्सन, क्विंटन डी कॉक, डोनोव्हन फरेरा, ट्रिस्टन स्टब्स, ओटनील बार्टमन, केशव महाराज, क्वेना मफाका, लुंगी एनगिडी, एनरिक नॉर्किया

## लग्नमोडले..। टीम इंडियाही खंबीरपणे पाठीशी, स्मृतीसाठी मोठा निर्णय

# स्मृती मानधनाचे लग्न मोडल्यानंतर जेमिमा रॉड्रिग्सची क्रिप्टिक पोस्ट

दिल्ली,८ डिसेंबर (पीएसआय)
भारतीय महिला क्रिकेटमध्ये गेल्या काही दिवसांत सर्वाधिक चर्चेत असलेला विषय म्हणजे स्मृती मंधानाच्या वैयक्तिक आयुष्यात झालेला मोठा बदल. २३ नोव्हेंबरला अचानक तिचे आणि संगीतकार पलाश मुच्छल यांचे नाते तुटल्याची बातमी समोर आली. काही तासांतच लग्न मोडले असल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगू लागल्या.मात्र, दोन्ही बाजूंकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया येत नव्हती. त्यामुळे चाहत्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. अखेर स्मृती आणि पलाशकडून नातं संपल्याचं अधिकृतपणे जाहीर झालं आणि त्यानंतर त्यांच्या चाहत्यांमध्ये खळबळ उडाली. स्मृतीच्या या निर्णयात टीम इंडियाच्या महिला खेळाडूंनी स्मृतीच्या मागे खंबीरपणे उभा राहायचं ठरवलंय. स्मृतीची जिवलग मैत्रीण आणि टीम इंडियाची स्टार खेळाडू जेमिमा रॉड्रिग्सने एक क्रिप्टिक पोस्ट सध्या चर्चेत आहे.
दरम्यान, स्मृतीची जिवलग मैत्रीण आणि टीम इंडियाची स्टार खेळाडू जेमिमा रॉड्रिग्स पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. कारण, स्मृतीच्या नात्यातील निर्णयासोबतच जेमिमाने केलेली एक क्रिप्टिक पोस्ट सध्या व्हायरल





होतेय. जेमिमाने इंस्टाग्रामवर एका बँडचं गाणं गातानाचा व्हिडिओ शेअर केला असून त्या गाण्यातील बोल चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. मफ्व्हरप ख छ्शशफ्फ हे गाणे हा बँड गातोय. या गाण्यातील बोल स्मृतीच्या परिस्थितीशी जुळत असल्याचे चाहत्यांचे मत आहे. काहींनी तर या गाण्याला थेट स्मृती आणि पलाशच्या नात्याशी जोडले आहे.
जेमिमाने व्हिडिओच्या थंबनेलवर लिहिलेलं वाक्य यामुळे पोस्टवरील चर्चा अधिक रंगल्या आहेत. सोशल मीडियावर चाहत्यांनी जेमिमाच्या पोस्टला स्मृतीसाठीचा पाठिंबा देत असल्याचं म्हणत आहेत. त्यात भर म्हणजे, जेमिमासह टीम इंडियाच्या दहा महिला क्रिकेटपटूंनी पलाश मुच्छलला इंस्टाग्रामवरून अनफॉलो केल्याची माहिती समोर आली आहे. या यादीत स्मृती मंधाना, रेणुका सिंह ठाकुर, दीप्ती शर्मा, ऋचा घोष, राधा यादव, श्रेयंका पाटील, अरुंधती रेड्डी, शिवाली शिंदे आणि यास्तिका भाटिया यांचा समावेश आहे.स्मृती मंधाना आणि पलाश मुच्छल यांची पहिली भेट २०१९ मध्ये मुंबईत झाली होती. एका कॉमन मित्राच्या ओळखीमुळे सुरू झालेली त्यांची मैत्री पाच वर्षांच्या नात्यात रूपांतरित झाली. दोघांनी लग्नाचा निर्णय घेतल्याचंही जवळच्या सूत्रांनी सांगितले होते. मात्र परिस्थितीने वळण घेतले आणि हे नाते अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच तुटले. स्मृतीच्या वैयक्तिक आयुष्यातील या निर्णयानंतर तिचे सहखेळाडू मानसिक पाठिंबा देत असल्याचं स्पष्टपणे दिसत आहे. जेमिमाची पोस्ट आणि खेळाडूंनी केलेली मअनफॉलोफ ॲक्शन यावरून महिला टीम तिच्यासोबत उभी आहे, असे चाहते म्हणत आहेत.

# भाजपाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुकांची भाऊगर्दी

## दोन दिवसात ६५० पेक्षा अधिक अर्ज दाखल; उद्या अंतिम दिवस

**लातूर/प्रतिनिधी** :आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका भाजपाकडून लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांकडून लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने अर्ज स्वीकृतीस प्रारंभ झाला आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुकांनी मोठी भाऊगर्दी केलेली पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात ७० जागांसाठी ६५० पेक्षा अधिक इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज पक्षाकडे दाखल केले आहे. इच्छुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या दिनांक १० डिसेंबर २०२५ हा अंतिम दिवस असून इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करावेत असे आवहान शहर जिल्हा भाजपाच्यावतीने करण्यात आले आहे. लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था



म्हणजेच मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ केला आहे. प्रदेश भाजपाकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया पार पडत आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा शुभारंभ शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, मनपाचे माजी गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला होता. भाजपाच्यावतीने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांची मोठी संख्या असल्यामुळे शहर भाजपा कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. शहरातील अठराही प्रभागातून इच्छुकांची संख्या मोठी असल्याने शहर जिल्हा कार्यालय गर्दीने फुलून गेलेले पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात उमेदवारी मागणाऱ्या इच्छुकांची संख्या ६५० पेक्षा अधिकची झाली आहे. प्रदेश भाजपकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया सुरु असून या सर्व इच्छुकांची यादी प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे. उमेदवारी निश्चितीसाठी उर्वरित प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असल्याने इच्छुकांना आपला अर्ज दाखल करण्यासाठी उद्या गुरवार दिनांक १० डिसेंबर २०२५ शेवटचा दिवस असणार आहे. लातूर शहर जिल्हा भाजपा कार्यालय सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत इच्छुकांचे अर्ज स्वीकारले जात असून इच्छुकांनी आपले अर्ज वेळेत दाखल करावेत असे आवाहन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

### दयानंद विज्ञानमध्ये संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०८ डिसेंबर २०२५ रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजंरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,बन्सी कांबळे,प्रा. विजयकुमार मांदळे,सुदाम सातपुते,किशोर जाधव,धीरज पारिख, बाबासाहेब बचाटे,श्रावण माळी, हाकानी शेख यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### कर्मचारी संघाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन !




**धाराशिव/प्रतिनिधी** : भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ शाखा धाराशिवच्या वतीने संघटनेचे अशोक बनसोडे, प्रभाकर बनसोडे, दिलीप वाघमारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला व अभिवादन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे प्रदिप शिंदे, रमाई फाऊंडेशनचे पृथ्वीराज चिलवंत, श्रीकांत चिलवंत, रवि कांबळे, यु.व्ही. माने, विजय गायकवाड, वाहूळकर साहेब, राजन माने, बलभीम कांबळे, अविनाश गायकवाड, सुनिल बनसोडे, बाळासाहेब माने, राजेंद्र धावारे इत्यादी उपस्थित होते.

### विष्णुदास अग्रवाल यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी** : येथील प्रिंटिंग व्यवसायातील ज्येष्ठ उद्योजक विष्णुदास रामकिशन अग्रवाल यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



लातूरच्या प्रिंटिंग व्यवसायातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले स्व. विष्णुदास अग्रवाल यांचे लातूरच्या मुद्रण क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय असे योगदान राहिले आहे. स्व. विष्णुदास अग्रवाल यांनी बदलत्या काळाप्रमाणे व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून ट्रेडलपासून ते बहुरंगी ऑफसेट छपाईची संपूर्ण यंत्रणा लातुरात उपलब्ध करून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. यशस्वी उद्योजक तसेच एक मानवतावादी दृष्टीकोनाने सर्वांना सोबत घेऊन चालणारे सर्वव्यापी व्यक्तित्वाचे धनी म्हणूनही त्यांची आपल्या निकटवर्तीयात ओळख होती. गरजवंतांच्या हाकेला ओ देण्याबरोबरच सर्वतोपरी सहकार्य करण्याकामीही ते कायम तत्पर असत. त्यांच्या जाण्याने लातूरच्या मुद्रण व्यवसायाची अपरिमित अशी हानी झाली आहे. त्यांनी उस्मानाबाद जिल्हा मुद्रण संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही पार पाडली होती. तसेच सन २००० मध्ये लातूर येथे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य मुद्रण परिषदेच्या ४६ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सक्षमपणे पार पाडली होती.

स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी, दि. ८ डिसेंबर २०२५ सकाळी लातूरच्या मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मंडळींची उपस्थिती होती. स्व . विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पश्चात नरेंद्र व कमलकिशोर अग्रवाल ही दोन उद्योजक मुले, एक मुलगी, सुना - नातवंडे असा मोठा परिवार आहे. अग्रवाल परिवाराच्या दुःखात जडे परिवार समिल आहे. मृतात्म्यास ईश्वर शांती प्रदान करो हीच ईश्वरचरणी प्रार्थना-संपादक

## मध्य रेल्वेच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस मध्य रेल्वेवर पाळण्यात आला. डॉ.आंबेडकर यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन मध्य रेल्वेवर ०८.१२.२०२५ रोजी पाळण्यात आला.

श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हेरिटेज इमारतीच्या फोयरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

श्री गोस्वामी यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते डॉ.




आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून आणि मेणबत्त्या प्रज्वलित करून श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी उपस्थित मध्य रेल्वेचे प्रधान विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी यांनीही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पांजली वाहून श्रद्धांजली अर्पण केली.

### अमृतराव कानडे यांचे निधन



**निलंगा/प्रतिनिधी** : तालुक्यातील नणंद येथील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक अमृतराव संभाजीराव कानडे वय ८५ यांचे सोमवार, ८ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास लातूरच्या न्यू भाग्यनगर येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खाडगाव रोड स्मशानभूमीत दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सुन, तीन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. निलंगा उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार सुभाष कानडे यांचे ते वडील होत.

### मुलांची भेट ठरली शेवटची, नागपुरात अजित पवार गटाच्या महिला नेत्याचा भीषण अपघात, जागीच मृत्यू

**नागपूर/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या, आधारविश्व फाउंडेशनच्या अध्यक्षा गीता सुशील हिंगे (५३) यांचं गडचिरोली-नागपूर महामार्गावर मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात जागीच निधन झालं. या अपघातात त्यांचे पती सुशील हिंगे (५७) गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर नागपूरमध्ये उपचार सुरू आहेत. या दुःखद घटनेने गडचिरोली जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.गीता हिंगे आणि त्यांचे पती सुशील हिंगे हे रविवारी नागपूर येथील कामे आटोपल्यानंतर आपल्या मुलांना भेटले आणि रात्री उशिरा आपल्या चारचाकी वाहनाने गडचिरोलीकडे परत येत होते. रविवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास गडचिरोली-नागपूर महामार्गावरील उमरेड तालुक्यातील पाचगावजवळ त्यांच्या कारला भीषण अपघात झाला.पाचगावजवळून जात असताना, रस्त्यावरील दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने आलेल्या एका वेगवान वाहनाने त्यांच्या कारला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मागच्या सीटवर बसलेल्या गीताताई हिंगे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि या दुर्घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.या अपघातात पती सुशील हिंगे आणि कारचालक हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत.

## मनपा मालकीच्या व बी ओ टी गाळेधारकांना व्याजात १००% सूट

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या गाळे व बी ओ टी गाळ्यांचे भाडे मोठ्या प्रमाणात थकीत असून, हि थकबाकी कमी होऊन अधिकाधिक भाडे वसुली व्हावी तसेच थकबाकी असलेल्या गाळेधारकांना भाडे भरण्यास प्रोत्साहित करण्याच्या हेतूने लातूर शहर महानगरपालिका मार्फत दि. ०८.१२.२०२५ ते दि. ३१.१२.२०२५ पर्यंत मनपा मालकीच्या व बी ओ टी तत्वा वरील गाळेधारकांना व्याजामध्ये १००% सुट जाहीर करण्यात आली आहे.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशान्वये व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या नियोजनात ही व्याजसुट योजना राबविली जाणार असून गाळेधारकांनी व्याजसुटीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने गाळेधारकांना केले आहे.



विविध गाळे धारकांच्या व्याजमाफी संदर्भात मागणीला सकारात्मक प्रतिसाद म्हणून व्याजसुट देण्याचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी घेतला आहे. तरी या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन ज्या गाळे धारकांकडे थकबाकी आहे अशा गाळेधारकांनी तात्काळ एकरकमी थकबाकीचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे व होणारी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## महिला सक्षमीकरणाकडे आणखी एक पाऊल; विलासराव देशमुख फाऊंडेशनतर्फे महापूर येथे ५६ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान

**लातूर/प्रतिनिधी** : विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने महापूर येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ५६ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ॲग्री लि. च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारतून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे.

महापूर येथील या प्रशिक्षण केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान देण्यात आले. प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या ५६ महिलांनी शिलाई कामातील कला आणि कौशल्ये आत्मसात केली.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, गावच्या सरपंच कल्पना माने, ग्राम सदस्य उत्तमराव वरवटे, संदीप माने, ग्रामसेवक अनंत सूर्यवंशी, ग्राम सदस्य श्यामकरण अंकुशे, अमोल कलबंडे, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## विभागीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मुलांचा संघ प्रथम तर मुलींचा संघ द्वितीय

**निलंगा/आयुब बागवान** : महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने चुरशीच्या सामन्यात धाराशिव जिल्ह्यातील संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक पटकावला तर मुलींच्या संघाचा धाराशिव जिल्ह्यातील संघाने पराभव केल्याने द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले.विजय संघातील १२ विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड झालेली आहे. यात आदित्य पाटील, सोहम नेलवाडे, काशीमखा सय्यद, शोएबखा पठाण, समीरखा पठाण, शाहिदखा पठाण, सादिक मुल्ला, महेश सूर्यवंशी, सुयश कदम, आदित्य मोहोळकर या यशस्वी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री.विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर, समन्वयक श्री. दिलीप धुमाळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य प्रा.प्रशांत गायकवाड, क्रीडा समन्वयक



प्रा. सूर्यकांत वाघमारे, क्रीडा प्रशिक्षक प्रा. यशोदा पाटील यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# निलंगा बस डेपोचे वेळापत्रक पूर्णपणे ढासळले!

## प्रवाशांचा प्रचंड मनस्ताप, प्रशासनाविरोधात संतापाचा स्फोट

**निलंगा/अयुब बागवान :** निलंगा बस डेपोची प्रवासी सेवा अक्षरशः कोलमडली असून वेळापत्रकाचा थोडा नाही तर पूर्ण बोजवारा उडाला आहे. दररोज निर्धारीत वेळेवर बस न सुटणे, काही बस मार्गातच गायब होणे, तर काही बस थेट इतर मार्गावर वळवणे या सर्व प्रकारांनी प्रवाशांचा संयम तुटला आहे.

डेपो व्यवस्थापनाच्या निष्क्रियतेमुळे प्रवासी आज अक्षरशः ''..... भरोशावर'' प्रवास करत आहेत.

प्रवाशांनुसार, कोणत्या बसला किती वेळ लागणार, ती कोणत्या मार्गावर जाणार, चालक आला का नाही याचा कोणालाच पत्ता नसतो. वाहतूक नियंत्रकांकडून मिळणारे उत्तर एकच: ''बस येईल थांबा.'' ही बेफिकीर भूमिका पाहून नागरिकांनी स्पष्टपणे आरोप केला आहे की निलंगा डेपोचे व्यवस्थापन पूर्णपणे बिनधास्त स्थितीत आहे.

या ढिसाळ कारभाराचा तात्काळ फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे.

विद्यार्थी गाड्या न मिळाल्यामुळे उशिरा शाळाकॉलेजात पोहोचत आहेत.

महिलांना थांब्यावर तासन्तास प्रतीक्षा.

शेतकरी आणि मजुरांचे काम विस्कळीत.

रुग्णांना वेळेत इस्पितळात जाणे कठीण.

बस सेवेसारख्या मूलभूत सुविधेत हा गोंधळ सुरू असेल, तर ग्रामीण भागातील जनतेची अडचण किती गंभीर आहे, हे सहज दिसून येते.

प्रवाशांचा थेट प्रश्न ''हा डेपो नेमका चालवतो कोण?''

निलंगा-बसपूर, निलंगा-उमरगा, निलंगा-औराद, निलंगा-लातूर यांसह सर्व मुख्य मार्गांवर बस वेळापत्रक तालबद्ध राहिलेलेच नाही.

चालकवाहक वेळेत अनुपलब्ध का?

वेळापत्रक कोण पाहतो?

डेपो प्रशासन नेमके करतं तरी काय?

या प्रश्नांची उत्तरे कोणाकडेच नसल्याने डेपोकडे ''व्यवस्था आहे का नाही'' या प्रश्नावरच जनतेत चर्चा सुरू आहे.

संतप्त प्रवाशांचा इशारा ''रास्ता रोको, डेपो बंद आंदोलन अपरिहार्य''

गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या गोंधळामुळे प्रवाशांचा राग टोकाला पोहोचला आहे.

**आता निर्णय घ्या; अन्यथा आम्हीही कठोर पाऊल उचलू,'' असा थेट इशारा प्रवाशांनी प्रशासनाला दिला आहे.**

बस वेळापत्रक निश्चित करून त्वरित सुरळीत केले नाही, तर गावागावातून रास्ता रोको, डेपो बंद आंदोलन पेट घेईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

लातूर-निलंगा मार्गाच्या उत्पन्नावर निलंगा आगार चालतो त्या प्रवासी वर्गाला लातूर बसस्थानक येथे तास न तास बस ची वाट पाहावी लागते.. तशीच परिस्थिती निलंगा बसस्थानक वरून लातूर जाणारे प्रवासी वर्गाची आहे...

**एमएसआरटीसीला जाग येणार तरी कधी?**



प्रवासी सेवा ही राज्य परिवहनची सर्वात मूलभूत जबाबदारी. तरीही निलंगा डेपोच्या अकार्यक्षमतेने प्रवाशांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे.

यावर तातडीने सुधारणा न झाल्यास ''जवाबदार कोण?'' या प्रश्नावर मोठा वादंग निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

## एक व्यक्ती एक मत आणि एकच मूल्य ही बाबासाहेबांचीच ऐतिहासिक देणगी : केशव कांबळे

**लातूर/मोईज सितारी:** एक व्यक्ती एक मत आणि एकच मूल्य ही जगाच्या लोकशाहीसाठी वाट दाखवणारी संकल्पना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीयांना दिलेली अमूल्य देणगी आहे.

भारत त्या काळी धर्माधिष्ठित जातीय व्यवस्था आणि विषमतेने वेढलेला होता. सामान्य नागरिक, स्त्रिया, अस्पृश्य, कामगार, शेतकरी या सर्वांना मतदानाचा हक्क नाकारण्यात आलेला होता. अशा परिस्थितीत २३ डिसेंबर १९१९ रोजी साऊथ ब्युरो आयोगासमोर बाबासाहेबांनी दिलेली साक्ष ही भारतीय लोकशाहीचे स्वरूप बदलणारी ठरली, असे आवाहन केशव कांबळे यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वैषाली बुद्धविहार, बौद्धनगर (लातूर) येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला उपस्थित उपासक उपासिकांनी तथागत भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ.




बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या वेळी बोलताना केशव कांबळे पुढे म्हणाले की,ब्राह्मण, ब्राह्मणेतर,हिंदू आणि अस्पृश्य या घटकांतील खोलवरच्या विषमतेमुळे सत्ता व शिक्षण मोजक्या वर्गापुरते मर्यादित होते. या अन्यायकारक निकषांना छेद देत, संपत्तीशिक्षणाच्या अटींचा पगडा हटवून, सर्व भारतीय स्त्रीपुरुषांना समान आणि सार्वत्रिक मतदानाचा अधिकार द्यावा, अशी निर्भीड मागणी बाबासाहेबांनी मांडली हे विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. ते पुढे म्हणाले की, १९२८ मध्ये सायमन कमिशनसमोर, नंतर गोलमेज परिषदेतही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासाठी सातत्याने आवाज उठवला. ब्रिटिश सरकार, कॉंग्रेस, उच्चवर्णीय हिंदू आणि मुस्लिम लीग या सर्व शक्तींशी एकाचवेळी झुंज देत असतानाही बाबासाहेबांनी भारतीयांना समान मताधिकार मिळवून देण्यासाठी अपार संघर्ष केला.

भारतीय राज्यघटना तयार करताना 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांतून सत्तेचे केंद्र स्वतः जनतेकडे देणारे प्रावधान बाबासाहेबांनी नव्या भारताला दिले. यामुळे लोकशाही खऱ्या अर्थाने लोकांची, लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालणारी बनली, असे मत कांबळेंनी व्यक्त केले.

मतदान हा फक्त अधिकार नाही, तर भारताचा नागरिक म्हणून आपली ओळख जपण्याचा सर्वोच्च मार्ग आहे. प्रत्येकाने आपल्या मताची किंमत ओळखून मतदानाचा हक्क निष्ठेने बजावला पाहिजे.असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

कार्यक्रमाला समाजबांधवांची उपस्थिती लक्षणीय होती.

## निलंगा बसपूर बस मार्गात मनमानीचा कळस!

### नियोजित बस औरादला वळवली; प्रवाशांत तीव्र संताप; रास्ता रोकोचा इशारा, एमएसआरटीसी प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**निलंगा/प्रतिनिधी :** निलंगा-बसपूर मार्गावरील एमएसआरटीसीची बेफिकीर व मनमानी प्रवासी सेवेला मारक ठरत असल्याचा ताजा प्रकार दि.०६ डिसेंबर २०२५ रोजी उघड झाला. सकाळी १०:३० वाजता निलंगा ते बसपूर या निश्चित वेळेची बस अचानक बसपूर ऐवजी औराद मार्गावर वळवण्यात आली. ही बस केळगाव-बसपूर या नियोजित मार्गावर जाण्याऐवजी चालक, वाहक आणि वाहतूक नियंत्रक यांच्या मनमानीने वळवली गेली, अशी गंभीर तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार निलंगा-औराद या मार्गावर आधीच पुरेशा बस उपलब्ध आहेत. दर १५ ते २० मिनिटाला ४ ते ५ बस या मार्गावर सुटतात. तरीदेखील बसपूरची ठरलेली बस औरादकडे वळवण्यामागे स्वार्थ, असा कारभार किंवा काही अधिकाऱ्यांची टोळीकरणाची भूमिका असल्याचा संशय प्रवाशांनी व्यक्त केला.

या प्रकारामुळे खडक उमरगा व आसपासच्या गावातील शेकडो प्रवाशांना निलंगा येथे यायला बस मिळाली नाही. विद्यार्थ्यांचे वर्ग बुडाले, रुग्णांना वेळेवर उपचारांसाठी जाता आले नाही, शेतकरी व कामगारांचे महत्त्वाचे काम अडकले, महिलांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला लोकवर्ग सेवेत असे निष्काळजीपणं अमान्य असल्याचा संताप प्रवाशांनी व्यक्त केला आहे.

यावर प्रशासनाकडून कोणतेही स्पष्ट उत्तर मिळाले नसून संपूर्ण डेपो व्यवस्थापनच प्रश्नांकित झाले आहे.

या मनमानीविरोधात ग्रामस्थांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे

''दररोजची वेळ पाळून बसपूर बस सोडली नाही, तर आम्ही रास्ता रोको करू याची सर्व जबाबदारी एमएसआरटीसी व्यवस्थापनाची असेल.

दिलेल्या तक्रारीवर नारायण सुभाष चव्हाण, माधव श्रीमंत,क्षिरसागर मोहन श्रीपती चव्हाण, वसंत कुमठे, रामराव निवृत्ती भुरे यांच्यासह अनेकांनी स्वाक्षरी करून या त्रासाविरोधात आवाज बुलंद केला आहे.

निलंगाबसपूर मार्गावरील प्रवासी सेवा स्थिर आणि निश्चित करावी अशीही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे..

### सामाजिक विषयाचे परखड भाष्य कीर्तावणी : स्वामीराज भीसे, त्रृचका खोत यांच्या संशोधन पूर्वक सादरीकरणाला प्रेक्षकांची दाद

**लातूर/प्रतिनिधी :** कीर्तावणी म्हणजे संपूर्ण संतसाहित्याचा अस्सल प्रसाद, अंतर्मुख करण्यासाठी मारलेली चपराक, मराठी लोकसंगीताचा उत्कट अविष्कार आणि तरुण पिढीच्या संशोधन पूर्वक सादरीकरणाचा आदर्श नमुना. मुक्ताबाई, कान्होपात्रा आणि जनाबाई यांनी विषम वागणूक देणाऱ्या पुरुषांना कोणते आणि कसे प्रश्न विचारले ? ज्ञानेश्वर, नामदेव, सेना, चोखामेळा, शेख महंमद, एकनाथ यांचे एकमेकांशी कसे संबंध होते? ते एकमेकांना कसा मान देत होते? आज आपण कुठे आहोत ? आपला क्षुद्रपणा कसा जपत आणि वाढवत आहोत? विषयीचं परखड भाष्य म्हणजे ''कीर्तावणी''. ऋचिका खोत, स्वामीराज भिसे यांनी प्रदीर्घ संशोधन करून तयार केलेली पावणे दोन तासांची संहिता ही गं.बा. सरदार यांनी म्हटल्याप्रमाणे ''संत साहित्याची फलश्रुती'' आहे. या दोघांची देहबोली थक्क करणारी आहे. असे मत स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेचे अतुल देऊळगावकर यांनी व्यक्त केले आहे.

### वळण ..

उठ सूठ आन्दोलन
पुरसे अल्पसेकारण
जरासा करा विरोध
उग्र अवतार धारण

वेगळी फौज तयार
देण्या हिंसकवळण
सार्वजनिक संपत्ती
रेडीमेड असे जळण

उद्रेक सर्वत्र पोचावा
सोईचे दळण वळण
विवेक संवेदनाशून्य
विसरे बा आकळण

विध्वंसमिरवणूकीत
रे अफवांचीउधळण
संयमी असून यंत्रणा
संतुलन हो उन्मळण

थयथयाट तो हिंसक
भितीने उडते गाळण
सु व्यवस्थेची मर्यादा
आदेशासमोरलोळण

सु संस्कृत माणूसकी
पुरती होते रे चाळण
नत मस्तक क्रोधापुढे
हरे नितीमत्ता पाळण

दोषखरोखर कुणाचा
चालते चौकशीदळण
मीचं आद्य जबाबदार
रे नको अन्यत्र पळण

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## संत नामदेव शाळेत 'मिशन पिंक हेल्थ'चा पाचवा स्तुत्य उपक्रम उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** संत नामदेव शाळेत मिशन पिंक हेल्थच्या वतीने आयोजित पाचवा आरोग्य-जागृती उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मुलींमध्ये आरोग्याविषयी योग्य समज, स्वच्छतेची जाणीव आणि मानसिक-शारीरिक सुरक्षितता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. वैशाली दाताळ, सचिव डॉ. राखी सारडा, सदस्या डॉ. अपूर्वा चिपुरे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. तिन्ही मान्यवरांनी विद्यार्थिनींसाठी माहितीपूर्ण व जागृतीपर सत्रे आयोजित करून महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. आरोग्यविषयक मार्गदर्शन सत्रांमध्ये डॉ. वैशाली दाताळ यांनी रक्तक्षय (ॲनिमिया) याची कारणे, लक्षणे तसेच योग्य आहाराचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. राखी सारडा यांनी मासिक पाळी स्वच्छता (Menstrual Hygiene) याबरोबरच सर्व्हिकल कॅन्सर लसीकरणाचे महत्त्व विद्यार्थिनींना समजावून सांगितले.

डॉ. अपूर्वा चिपुरे यांनी 'गुड टच-बॅड टच' या संवेदनशील विषयावर मुलींना स्वसंरक्षणाची जाणीव करून दिली. त्याचबरोबर मोबाईल व्यसनाच्या दुष्परिणामांवरही



प्रभावी जनजागृती केली. कार्यक्रमाच्या अंतर्गत Aristo झहरीरचे सुधाकर गोंड, महेश पावले आणि नामदेव डोईफोडे यांच्या सहकार्याने सुमारे १०० विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी (क्ल ऊशींशलींळेप उरा) करण्यात आली. ज्यांच्यात रक्तक्षय आढळला, त्या मुलींना आवश्यक लोहगोळ्यांचे वाटप करण्यात आले. या चाचणीमुळे विद्यार्थिनींच्या आरोग्यस्थितीचा महत्त्वाचा आढावा घेण्यात संस्थेला मदत झाली.या उपक्रमासाठी संत नामदेव शाळेच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री पारगे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. तसेच डॉ. सागीर पठाण आणि डॉ. प्रीती यांचीही उपस्थिती लाभली, ज्यामुळे कार्यक्रमाची शैक्षणिक मूल्यवृद्धी झाली.भविष्यात अधिक शाळांमध्ये उपक्रम राबविण्याचा संकल्प मिशन पिंक हेल्थचा हा पाचवा यशस्वी उपक्रम ठरला असून पुढील काळात अधिकाधिक शाळांमध्ये जाऊन मुलींच्या आरोग्यजागृतीसाठी नियमित उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे. मुलींच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर प्रकाश टाकत, जागरूकता वाढवत आणि प्रतिबंधात्मक उपाय सुचवण्याची त्यांची ही सातत्यपूर्ण धडपड समाजासाठी निश्चितच आदर्श म्हणता येईल.

ही उपक्रमशीलता आणि सामाजिक बांधिलकी पाहता मिशन पिंक हेल्थ मुलींच्या सर्वांगीण आरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचे परिपूर्ण निदर्शनास येते.

### महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संत शिरोमणी संताजी जगनाडे यांची जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव समिती आणि कार्यालय द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. जे. एच. देशमुख, हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, प्रा. व्ही. जे. दुडिले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि सोपान सुतार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी संत जगनाडे महाराज यांची माहिती दिली. अध्यक्षीय समारोप प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला तर आभार डॉ. जे. एच. देशमुख यांनी मानले.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Work of AMC for Weed Control Treatment to switchyard area and anti-termite, anti-reptile and rodent control treatment in control room of 220KV & 132KV Sub-stations & administrative office under EHV O&M Division, Latur | EE/EHV/O&M/LTR/TS/2025-26/T-09 | 7000038325 |

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The ADEE (O) Phone No. +918956304921.
The DYEE (O) Phone No. +918554995271.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**(Mr. Aftab Khan)**
**Executive Engineer, EHV (O&M) Division Latur**

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६